| वर्ष - 9 | अंक -139 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

आतील पानांत
- रोमांचक सामन्यात इंडियाचा विजय!
- विराट कोहलीचा वर्ल्ड रेकॉर्ड
- उशीर होण्यापूर्वी अमेरिकेशी करार करा
- उत्तर भारतात पुन्हा थंडीची लाट

www.mahaenews.com | सोमवार, दि. 12 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

मुंबई महापालिका निवडणूक : राज ठाकरे यांची भावनिक भूमिका, नाराजांची दिलगिरी

# मुंबई विकायला काढली!

## देश विकायला काढला... एवढी हिंमत आली कुठून?

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

**राज्यातील महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असतानाच मुंबईत आज एक ऐतिहासिक दृश्य पाहायला मिळाले. तब्बल वीस वर्षांनंतर मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे एकाच मंचावर एकत्र आले. मुंबई महापालिका निवडणुकीसाठी मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाची अधिकृत युती जाहीर झाल्यानंतर झालेल्या या जाहीर सभेत राज ठाकरे यांनी आक्रमक, भावनिक आणि थेट शब्दांत भाजपवर जोरदार टीका केली. "अख्खी मुंबई, महाराष्ट्र आणि देश विकायला काढलाय. एवढी हिंमत आली कुठून?" असा संतप्त सवाल करत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर घणाघात केला.**




- २० वर्षांनंतर ठाकरे बंधू एकाच मंचावर
- मुंबई महापालिका निवडणुकीसाठी मनसे–शिवसेना (ठाकरे गट) युतीचा एल्गार
- भाजपवर जोरदार हल्लाबोल
- मुंबई महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत ठाकरे बंधू एकत्र
- भाजपवर 'मुंबई–महाराष्ट्र विक्रीचा डाव' असा आरोप

> "मी आज बऱ्याच गोष्टी आपल्यासाठी घेऊन आला आहे. जाताना पोटभरुन जा. अनेक सामाजिक संस्था मराठीवर काम करणारे आहेत, अनेक लोकं आहेत ज्यांनी आवाज उचलला त्यांचे मी आभार मानतो. अनेक टीव्ही, वृत्तपत्राचे संपादक, पत्रकार आहेत. त्यांनी साथ दिली. त्यांचे मनापासून आभार मानतोय. मी २० वर्षांनी पहिल्यांदा युती करतोय. त्यामुळे या युतीच्या प्रक्रियेत अनेक लोकांना तिकिट नाही देता आली, अनेक जण नाराज झाले. काहींना वाटलं दुसऱ्या पक्षात जावं. काही गोष्टी झाल्या. होतात. त्या आमच्या हातात नसतं. पण त्यांना दुखवणं आमचा हेतू नव्हता. तरी नाराज झाले असतील तर त्या सर्वांची दिलगिरी व्यक्त करतो. आपलेच आहेत. परत येतील. कारण आता आहेत तेच कुठे जातील ते माहिती नाही त्यामुळे जे गेले आहेत ते परत येतील. या सर्व गोष्टींमध्ये मी त्यांना समजू शकतो",
>
> - राज ठाकरे

सभा सुरू होताच राज ठाकरे यांनी दोन भावांच्या एकत्र येण्यामागील भावनिक आणि राजकीय कारणे स्पष्ट केली. "आज आमचे आई-वडील, आजोबा हजर असायला हवे होते. मराठी माणसासाठी आणि मुंबईकरांसाठी उभारलेला हा लढा ते वरून पाहत असतील," असे सांगत त्यांनी सभेला भावनिक स्पर्श दिला. वीस वर्षांनंतर पहिल्यांदाच उद्धव ठाकरे यांच्यासोबत युती करत असल्याचे सांगताना त्यांनी कार्यकर्ते, पदाधिकारी आणि उमेदवारांबाबतही मोकळेपणाने भूमिका मांडली.

युतीच्या प्रक्रियेत अनेकांना उमेदवारी देता आली नाही, त्यामुळे काही जण नाराज झाले, काहींनी पक्ष सोडला, हे वास्तव त्यांनी स्पष्ट शब्दांत मान्य केले. "कोणालाही दुखावण्याचा आमचा हेतू नव्हता. पण तरीही जे नाराज झाले असतील, त्या सर्वांची मी दिलगिरी व्यक्त करतो," असे म्हणत राज ठाकरे यांनी कार्यकर्त्यांची मने जिंकण्याचा प्रयत्न केला. गेलेले लोक आपलेच असून ते पुन्हा परत येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. "आज जे आहेत, ते कुठे जातील याचा नेम नाही," असा सूचक टोला त्यांनी सध्याच्या राजकीय परिस्थितीकडे इशारा करत लगावला.

राज ठाकरे म्हणाले की, मी आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्यामागचे मुख्य कारण म्हणजे मुंबईवर आलेले संकट. "गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही भाषणांतून हे मुद्दे मांडत आलो आहोत. राज्यात एक विशिष्ट डाव रचला जात आहे. हिंदी सक्तीचा विषय पुढे आणला गेला. तेव्हा उद्धव आणि मी दोघेही कडाडलो. महाराष्ट्र कोणत्याही भांडणापेक्षा मोठा आहे, हे मी स्पष्टपणे सांगितले होते," असे ते म्हणाले. हिंदी सक्तीचा विषय हा जनतेची नाडी तपासण्यासाठी आणला गेला होता, पण महाराष्ट्र जागा असल्याचे दाखवून दिल्याचा दावा त्यांनी केला.

२०२४ नंतरच्या राजकीय परिस्थितीवर टीका करताना राज ठाकरे अधिक आक्रमक झाले. "विधानसभा निवडणुकीनंतर सरकारला जे मनाला येईल ते करायला सुरुवात झाली. कुणाला विचारायचं नाही, लोक नावाची गोष्ट नाही. पैसे फेकले की लोक विकत घेता येतात, असा आत्मविश्वास कुठून आला?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. पूर्वी सत्तेत असलेले नेतेही जनतेला घाबरत होते, पण आज सत्ताधाऱ्यांना जनतेची भीती उरलेली नाही, असा आरोप त्यांनी केला.

निवडणूक यंत्रणा आणि राजकीय युतींवरही राज ठाकरे यांनी टीका केली. "अकोटमध्ये एमआयएमसोबत आणि बदलापूरमध्ये भाजपने काँग्रेससोबत युती केली. ६६ जागा बिनविरोध आल्या. उद्या हा आकडा वाढेल. लोकांना कसं विकत घ्यायचं, हे त्यांना कळलंय," असा आरोप त्यांनी केला. "वाईट हे वाटतं की आपण विकले जातोय," असे सांगत त्यांनी थेट जनतेलाही आरसा दाखवला.

भाजपकडून उमेदवारी दिलेल्या काही वादग्रस्त व्यक्तींवर बोलताना राज ठाकरे संतप्त झाले. "ड्रग्ज विकणाऱ्याला तिकिट दिलं जातं, बलात्काराच्या गुन्ह्यातील आरोपीला नगरसेवक केलं जातं. तुमच्या नाकावर टिच्चून हे सगळं होतंय. ही हिंमत आली कुठून?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. निवडणूक जिंकण्यासाठी वेड्या-वाकड्या पद्धतीने यंत्र-तंत्र हस्तगत केलं गेलं, तेव्हाच सत्तेची मस्ती येते, असा आरोप त्यांनी केला. वाढवण बंदराच्या मुद्द्यावरूनही राज ठाकरे यांनी मोठा दावा केला. "या बंदराला लागून गुजरात आहे.

मुंबई गुजरातकडे नेण्यासाठी पालघर आणि ठाणे जिल्हा ताब्यात

युती धर्म पाळला नाही

## मुख्यमंत्री फडणवीस पुण्यातून निवडणूक लढवणार?

# मी आतापर्यंत संयम पाळला

## मुख्यमंत्री फडणवीसांचं मोठं वक्तव्य

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. प्रचाराच्या माध्यमातून आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. राजकीय नेत्यांमध्ये टीका-टिप्पणी सुरू असल्यामुळे राजकारण तापलं आहे. या पार्श्वभूमीवर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुण्यात एक मुलाखत पार पडली.**



या मुलाखतीत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मोठं वक्तव्य केलं.'मी आतापर्यंत संयम पाळला, पण अजित पवारांचा संयम ढळलाय', असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी अजित पवार यांनी भाजपावर केलेल्या टीकेवर बोलताना म्हटलं आहे.मुलाखतीत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, "देवाभाऊ काही बोलत नाही, देवाभाऊचं काम बोलतं." तुम्ही म्हणता तुमचं काम बोलतं, मग अजित पवार सारखी टीका का करतात? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर बोलताना फडणवीस म्हणाले की, "अजित पवार हे बोलतात, पण माझं काम बोलतं. मात्र, मला या ठिकाणी सांगितलं पाहिजे की या निवडणुकीत आमच्या हे लक्षात आलं होतं, की पुणे असेल किंवा पिंपरी-चिंचवड, या ठिकाणी आम्ही युतीत लढू शकत नाहीत. कारण आमच्या पक्षांची मोठी ताकद आहे. त्यामुळे आम्ही ठरवलं होतं की आपण वेगवेगळं लढायचं." "मी असं सांगितलं होतं की आपण ज्या ठिकाणी वेगवेगळं लढत आहोत, त्या ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत आहोत असं समजून एकमेकांवर टीका करायची नाही. मी आत्तापर्यंत तो संयम पाळला, पण अजित पवारांचा संयम ढळला. कदाचित निवडणुकीतील परिस्थिती पाहून अजित पवारांचा संयम काहीसा कमी झालेला मला दिसतोय. त्यामुळे ते बोलत आहेत. पण १५ तारखेनंतर अजित पवार बोलणार नाहीत असा विश्वास आहे", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुण्यात एक मुलाखत पार पडली. या मुलाखतीत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मोठं भाष्य केलं. ख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुण्यातून निवडणूक लढणार का? असा प्रश्न विचारण्यात आला असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "या ठिकाणी मुरलीधर मोहोळ बसलेत, दादा (चंद्रकांत पाटील) या ठिकाणी बसलेत. आमचं चांगलं चालंलय, नागपूरकरांचं माझ्यावर मनापासून प्रेम आहे. सहा-सहा वेळा त्यांनी मला निवडून दिलं आहे. त्यामुळे पुण्यावर फक्त प्रेम ठेवायचं, पण निवडणूक नागपूरमधूनच लढवायची आहे", असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे.पिंपरी चिंचवडमध्ये बोलताना अजित पवारांनी भाजपावर टीका केली होती. त्यानंतर भाजपाच्या नेत्यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं होतं. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी एका मुलाखतीत बोलताना अजित पवारांच्या वक्तव्यावर नाराजी व्यक्त केली होती. फडणवीस म्हणाले की, "मी युतीचा धर्म पाळला, पण अजित पवारांनी युती धर्म पाळला नाही. अजित पवारांनी जी वक्तव्यं केली ती वक्तव्यं मला पटलेली नाहीत. पण मी त्याचा प्रतिवाद केलेला नाही. या निवडणुकीत मी पहिल्या दिवशी पासून ठरवलं होतं की मित्र पक्षांवर टीका करणार नाही. ती मी केली नाही. दुसरं ठरवलं होतं की मी कुठल्याही नेत्यावर टीका करणार नाही.

### अजित पवार काय म्हणाले?

विकासावर बोललं नाही तर लोकांना हे वाटू शकतं की आम्ही दुर्बल आहोत. पुणे- पिंपरीत मी युतीचा धर्म पाळला. अजित पवारांनी युती धर्म पाळला नाही." असं म्हणत फडणवीसानी नाराजी व्यक्त केली.अजित पवारांनी युती धर्म पाळला नसल्याचं देवेंद्र फडणवीस यांनी बोलून दाखवलं. त्यांच्या या वक्तव्याबाबत पत्रकारांनी अजित पवारांना प्रश्न विचारला. त्यावर बोलताना अजित पवार म्हणाले की, "मी कुठे टीका केली.

# पुण्यातील ठेवीदारांची कोट्यवधींची फसवणूक

## पसार झालेले अटकेत; हैद्राबाद विमानतळावर आर्थिक गुन्हे शाखेची कारवाई

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**ठेवीदारांची दोन कोटी ३८ लाख ५० हजार रुपयांची फसवणूक करुन पसार झालेल्या ट्रेडज इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. कंपनीच्या संचालकांना आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली. याप्रकरणी सचिन खडतरे (रा. करकंब पंढरपूर, सोलापूर), प्रसाद कुलकर्णी (वय ३६ रा. सारंग सोसायटी नांदेडसिटी पुणे) यांना अटक करण्यात आली आहे.**




या प्रकरणी आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपी खडतरे, कुलकर्णी यांना शेअर बाजारा गुंतवणूक केल्यास दरमहा आठ टक्के परतावा मिळेल, असे आमिष दाखविले होते. आरोपींनी ठेवीदारांकडून दोन कोटी ३८ लाख रुपये घेतले होते.

आरोपींनी कंपनीच्या संकेतस्थळावर ठेवीदारांना परतावा मिळाल्याचे भासविले होते. मात्र, प्रत्यक्षात ठेवीदारांना परतावा देण्यात आला नव्हता. ठेवीदारांच्या तक्रारीनंतर आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. आरोपी परदेशात पसार होण्याची शक्यता असल्याने आर्थिक गुन्हे शाखेकडून 'लूक आऊट नोटीस' बजाविण्यात आली होती. आरोपी सचिन खडतरे आणि प्रसाद कुलकर्णी हे ३० डिसेंबर रोजी शारजा ते हैद्राबाद विमान प्रवास करत असल्याची माहिती पथक हैद्राबादला रवाना झाले. हैद्राबाद विमानतळ परिसरात सापळा लावून दोघांना अटक करण्यात आली.अतिरिक्त पोलीस आयुक्त पंकज देशमुख, आर्थिक गुन्हे शाखेचे उपायुक्त विवेक मासाळ, सहायक आयुक्त शुभदा संखे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष खेतमाळस,चव्हाण, मुसळे यांनी ही कारवाई केली. आरोपींना अटक करून पुण्यातील विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दोघांना पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

### फसवणुकीचे प्रकार वाढले

ऑनलाइन व्यवहार, गुंतवणुकीचे आमिष दाखवून फसवणूक करण्याचे प्रकार वाढले आहेत. फसवणूक प्रकरणात ठेवीदारांची पैसे परत करण्यासाठी पोलिसांनी प्रयत्न केले. २०२१ मध्ये फसवणुकीचे ६३४ गुन्हे दाखल झाले होते. २०२२ मध्ये हा आकडा वाढून ९३० झाला होता. २०२३ मध्ये ९८२ गुन्ह्यांची नोंद झाली होती. २०२४ मध्ये फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली. २०२४ मध्ये एक हजार ८१३ गुन्हे वेगवेगळ्या पोलीस ठाण्यात दाखल झाले. २०२५ मध्ये फसवणुकीच्या गुन्ह्यांमध्ये काही प्रमाणात घट झाली. गेल्या वर्षी एक हजार ४५९ फसवणुकीचे गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान MLA महेश लांडगे यांचे पिंपरीतील भाषण

# अन् NCP ची अक्षरश: झोप उडाली?

## मिशन- PCMC : शहराच्या इतिहासात पहिल्यांदा पवार कुटुंबियांनी तळ ठोकला

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी अशी लढत होईल, असे निश्चित होते. अपेक्षेप्रमाणे तसेच झाले. मात्र, राष्ट्रवादीला भाजपाविरोधात वातावरण निर्मिती करता येत नव्हती. पिंपरीत आमदार महेश लांडगे यांचे भाषण झाले. त्या ठिकाणी "स्पार्क" झाला आणि संपूर्ण महाराष्ट्रातील राष्ट्रवादीची यंत्रणा एकट्या महेश लांडगे यांच्यावर तुटून पडली. सोशल मीडियावर ते "ट्रोल" होवू लागले.**




वास्तविक, पिंपरीत पहिल्यांदा सभा अजित पवारांची झाली होती. त्या सभेत त्यांनी महेश लांडगे आणि भाजपावर बेच्छुट आरोप केले. त्याअगोदर पवारांनी प्रेस कॉन्फरन्स घेतली. त्यामध्येसुद्धा विकासाच्या मुद्यांवर नव्हे, तर महापालिकेतील कथित भ्रष्टाचार आणि गुंडगिरीच्या मुद्यांवर त्यांनी भाजपा आणि महेश लांडगे यांना 'टार्गेट' केले. मात्र, पिंपरीतील महेश लांडगे यांची प्रत्युत्तर सभा निर्णायक ठरली. किंबहुना, ही सभा महापालिका निवडणुकीचा "टर्निंग पॉईंट" ठरणार आहे. कारण, या सभेत आमदार महेश लांडगे यांनी स्थानिक भूमिपुत्रांचा स्वाभिमान जागृत केला. पिंपरी-चिंचवडकर स्वत:चे निर्णय स्वत: घेवू शकतात..आपल्याला कुणाच्या दारात जाण्याची गरज नाही... अशी भावनिक साद घातली. या सभेत उपस्थिती ज्येष्ठांच्या डोळ्यांत पाणी पहायला मिळाले.

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात तत्कालीन स्थायी समिती सभापती नितीन लांडगे यांना कसे जाळ्यात पकडण्यात आले? 30-35 वर्षांत स्थानिक भूमिपुत्र नेत्यांना राष्ट्रवादीने कसे बदनाम केले. स्थानिक नेतृत्त्व मोठे होवू नये. किंबहुना, "पिंपरी-चिंचवडकर नेत्यांनी कायम पवारांच्या पायाशी स्वाभिमान ठेवला पहिजे" अशी यांची भावना आहे. त्यामुळेच ही मंडळी षडयंत्र करीत आहेत. त्यामुळे आता भूमिपुत्रांनी जागृत झाले पाहिजे. आपल्यातील एखादं नेतृत्व मोठं होवू द्या. त्याला मदत करा. कितीदिवस आजोबा, पुतण्या त्याचा मुलगा यांच्यासाठी गाड्या हाकायच्या..? असा स्वाभिमानी हुँकार महेश लांडगे यांनी दिला.

पिंपरी-चिंचवड शहरातील राजकारणावर गावकी-भावकी, नाती-गोती यांचा मोठा पगडा आहे. गावकी भावकी एक झाली, तर राष्ट्रवादीला विरोधी पक्षात बसण्यासारखेसुद्धा संख्याबळ मिळणार नाही, ही वस्तुस्थिती आहे. दुसऱ्या बाजुला महेश लांडगे यांनी विधानसभा निवडणुकीत 22 नगरसेवकांचे राष्ट्रवादीत इनकमिंग केल्याचा वचपा आता महापालिका निवडणुकीत काढला. निवडणुकीच्या शेवटच्या क्षणी राष्ट्रवादीचे 22 नगरसेवक भाजपात दाखल करुन घेतले. त्यामुळे ही निवडणूक भाजपाच्या बाजुने झाली होती. भ्रष्टाचाराच्या मुद्याला 70 हजार कोटींचा कथित घोटाळा, पुण्यातील महार वतनाच्या जमीनीचा घोटाळा अशी जोड दिली. त्यामुळे राष्ट्रवादीचे अक्षरश: अवसान गळाले. पिंपरी-चिंचवड आणि पुणे किंबहुना पुणे जिल्ह्यातील वर्चस्वाची लढाई असल्यामुळे राष्ट्रवादी आणि दस्तुरखुद्द अजित पवार यांची अस्वस्थता शिगेला पोहोचली होती. पिंपरीतील महेश लांडगे यांची सभा निर्णायक ठरणार... गावकी-भावकी, नाती-गोती एक होणार... या भितीने धास्तावलेल्या राष्ट्रवादीने अखेर "अजितदादांचा ऐकेरी शब्दांत उल्लेख केला..." असे "व्हीक्टिम कार्ड" वापरले. त्यावर प्रतिहल्ला करण्यासाठी पुण्यातील रुपाली ठोंबरे यांच्यापासून सुरज चव्हाण यांच्यापर्यंत आणि अमोल मिठकरीपासून विकास लवांडे यांच्यापर्यंत सगळी यंत्रणा कामाला लागली. ट्रोलिंग एजन्सीच अक्षरश: तुटून पडल्या. प्रसारमाध्यमांमधून विविध अँगल्सनी बातम्या पेरण्यात आल्या. मात्र, यामुळे राष्ट्रवादीला फायदा होणार नाही, उलट महेश लांडगेंप्रति महाराष्ट्रभरात सहानुभूती निर्माण झाली. आधी त्याच्यावर आरोप केले, तुमच्यावर आल्यावर मग का त्रागा-का त्रास होतो, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांमधून विचारला जात आहे.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादीची हवा काढली..!

राज्यातील महायुती सरकारमध्ये एकत्रित असल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत:च्या पक्षाचे आमदार महेश लांडगे यांचे कान टोचतील, अशी अपेक्षा राष्ट्रवादीला होती. मात्र, तसे झाले नाही. उलटपक्षी, फडणवीस यांनी लांडगेंची पाठराखण केली. "त्यांच्याकडे स्वत:च्या सत्ताकाळात केलेली कामे सांगता येत नाही. त्यामुळे त्यांना वाद-विवाद, सवाल-प्रतिसवाल झाला पाहिजे, अशी अपेक्षा आहे. त्यांच्याकडे लक्ष देवू नका.

आपण केलेली कामे लोकांना सांगा. पिंपरी-चिंचवडमधील नागरिक भाजपासोबत आहेत, " असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी आकुर्डीतील जाहीर सभेत महेश लांडगेंना दिला. याच सभेत "महायुतीमधील नेत्यांचा आदर फक्त भाजपाच्या कार्यकर्त्यांनीच ठेवायचा का?" असा प्रश्न लांडगे यांनी केला. यावर CM फडणवीस म्हणाले की, "परिंदे को मिलेगी मंजील एक दिन, ये उनके फैरे हुए पंख बोलते है। और वहीं लोग रहतें है खामोश अक्सर जमानें में उनके हुनर बोलते है।" आपलं काम बोलतंय... आणि त्यामुळेच या समोरच्या लोकांचा वैताग आहे. कोणताही राजकीय आरोपाला उत्तर न देता मुख्यमंत्र्यांनी राष्ट्रवादीची सर्व हवा काढून घेतली, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

### पार्थ पवार यांच्या पराभवाची पुनरावृत्ती होणार?

2019 मध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांना मावळ लोकसभा मतदार संघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले होते. त्यावेळी स्थानिक भूमिपुत्राला मावळची उमेदवारी मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र, स्थानिकांची संधी डावलून राष्ट्रवादीने पार्थ पवार यांना उमेदवारी दिली. त्यावेळी स्थानिक भूमिपुत्रांचा स्वाभिमान दुखावला होता. त्याची परीणिती निकालात झाली. पार्थ पवार यांचा सुमारे अडीच लाख मतांनी पराभव झाला. त्यावेळीसुद्धा राष्ट्रवादीचे राज्यातील बडे-बडे नेते आणि एजन्सीज पिंपरी-चिंचवड आणि मावळात दाखल झाल्या होत्या. तरीही राष्ट्रवादीला विजय मिळवता आला नाही. त्याअगोदर 2017 मध्ये "नको बारामती... नको भानामती" अशी घोषणा भाजपाने दिली. त्यावेळी राष्ट्रवादीला महापालिकेतील सत्ता गमवावी लागली होती. आता पुन्हा आमदार महेश लांडगे यांनी "पिंपरी-चिंचवडकरांनो आपला स्वाभिमान जागृत ठेवा...म्हणा मी स्वाभिमानी पिंपरी-चिंचवडकर..." अशी घोषणा केली. यावर राष्ट्रवादी आणि अजित पवार यांच्या यंत्रणेकडून महेश लांडगे यांच्यांविरोधात खालच्या पातळीवर टीका केली. त्यामुळे 2017 महापालिका निवडणूक 2019 पार्थ पवार यांच्या पराभवाची पुनरावृत्ती या महापालिका निवडणुकीतसुद्धा होईल, असे राजकीय जाणकार सांगतात.

# राष्ट्रवादी उमेदवारांच्या प्रचारासाठी माजी आमदार विलास लांडे सरसावले !

## मिशन- PCMC : प्रभाग 7 मध्ये मॉर्निंग वॉकच्या माध्यमातून मतदारांशी थेट संवाद, मतदानाचे आवाहन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ७ मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी माजी आमदार विलास लांडे यांनी पुढाकार घेतला असून, त्यांच्या नेतृत्वाखाली मॉर्निंग वॉकचे आयोजन करण्यात आले. या अनोख्या प्रचार उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जय तुळजा भवानी वॉकिंग ग्रुप व जायका चहा कट्टा, भोसरी यांच्या वतीने या मॉर्निंग वॉकचे आयोजन करण्यात आले होते. शीतल बाग ते सीएमई रस्ता या मार्गावर सकाळी नागरिक, कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**



या मॉर्निंग वॉकमध्ये प्रकाश भडकुंबे, निवृत्ती फुगे, चंद्रकांत गोरे, अशोक बिचकुले, विकास गव्हाणे, नंदू गव्हाणे, मच्छिंद्र (आण्णा) डफळ, जयेश गव्हाणे, रोहिदास खोंडे, खाचणे यांच्यासह अनेक नागरिक, कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

प्रभाग क्रमांक 7 (सॅन्डवीक कॉलनी, खंडोबामाळ, लांडेवाडी) मधील अ प्रवर्गातून विराज विश्वनाथ लांडे, ब प्रवर्गातून अनुराधा सुशिल लांडगे, क प्रवर्गातून अश्विनी निलेश फुगे आणि ड प्रवर्गातून अमोल मधुकर डोळस हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार आहेत.

मॉर्निंग वॉक दरम्यान माजी आमदार विलास लांडे यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या, अपेक्षा आणि विकासाबाबत चर्चा केली. जायका चहा कट्टा येथे थांबून त्यांनी सर्वांशी आपुलकीने गप्पा मारल्या. यावेळी येत्या महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या चारही उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन केले. "प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी सक्षम आणि काम करणारे प्रतिनिधी निवडून देणे आवश्यक आहे," असे मत व्यक्त करत विलास लांडे यांनी प्रचारात सक्रिय सहभाग घेतल्याने कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. प्रचाराच्या रणधुमाळीत विलास लांडे यांनी घेतलेला हा पुढाकार प्रभाग ७ मध्ये राष्ट्रवादीसाठी सकारात्मक वातावरण निर्माण करणारा ठरत आहे, अशी प्रतिक्रिया उपस्थित नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली.




**शिक्षणाचा प्रसार वाढत असूनही लोक बुवा-बाजीच्या मागे लागले आहेत. अजूनही देशात अशा बुवाबाजीतून फसवणूक होण्याचे प्रकार वाढत असतात. कोणी गुप्तधनाच्या शोधासाठी आपली जमापुंजी या भोंदूबाबांच्या चरणी वाहतात, तर कोणी पैसे दुप्पट करण्यासाठी चमत्कारावर विश्वास ठेवून पैसा खर्च करतात आणि त्यानंतर मग आपली पुरती फसगत झाल्याचे उघडकीस आल्यानंतर असे लोक जागे होतात.**

# अंधश्रद्धेला प्रोत्साहन का मिळत आहे ?



आता नवी मुंबईसारख्या आधुनिक शहरात असा प्रकार घडला आहे. पैसे डबल करतो म्हणून भोंदूबाबाने एका कुटुंबाला २० लाखांना गंडा घातला आहे. आपला देश वेगाने विकसित होत आहे. आपले डॉक्टर आणि अभियंते जगभरात मोठे यश मिळवत आहेत. दुसरीकडे, अंधश्रद्धेची मुळे कमकुवत होण्याऐवजी खोलवर जात आहेत. जादूटोण्याच्या नावाखाली मानवतेच्या लज्जास्पद प्रतिमा वारंवार उघड होतात. अंधश्रद्धेचे अनेक प्रकार दिसून येतात. अंधश्रद्धेचे मुख्य कारण म्हणजे पुरावा किंवा तर्काशिवाय कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवण्याची प्रवृत्ती. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव स्पष्ट आहे. अंधश्रद्धा विकास आणि प्रगतीमध्ये एक मोठा अडथळा आहे. ज्या युगात विज्ञान जगभरात नवीन उंची गाठत आहे, जटिल आजारांवर उपचार करण्याच्या नवीन पद्धती शोधल्या जात आहेत आणि नवीन शोध लावले जात आहेत, त्या युगात या अंधश्रद्धा अयोग्य आहेत. केवळ सामाजिक संघटनांनीच नव्हे, तर सरकारनेही शिक्षण व्यवस्थेत अंधश्रद्धेविरुद्ध धडे समाविष्ट करण्याची तसेच व्यापक जागरूकता मोहिमा सुरू करण्याची गरज आहेम्हणून भोंदू बाबाने घरात पूजा करून त्यांचे २०लाख रुपये घेऊन पोबारा केला होता. या प्रकरणाची वर्षा फिर्यादीने तक्रार दाखल केली सीबीडी पोलीस स्टेशनमध्ये सीबीडी पोलिसांनी अवघ्या २४ तासाच्या आत या भोंदूबाबाला आणि त्याच्या चालकाला अटक केली आहे. सनी रमेश भोसले नावाच्या एका मांत्रिकाने तर चक्क बायको पळवून नेली, अशी तक्रार एका तरुणाने पोलीस स्टेशनला दिली. एक तरुण आपल्या घरची समस्या घेऊन त्या मांत्रिकाकडे गेला. तेव्हा त्या मांत्रिकाने तुमच्यावर कोणीतरी करणी केली आहे. तुम्हाला या करणीतून बाहेर यावं लागेल. यासाठी ६०-७० हजार रुपयांच्या खर्च येईल, असे सांगितले. त्या तरुणाने त्या मांत्रिकावर विश्वास ठेवला आणि त्याला पंचावन्न हजार रुपये दिले. दोन महिने झाल्यानंतर देखील त्या तरुणाच्या समस्येवर कोणताही उपाय त्या मांत्रिकाने केला नाही. तेव्हा आपली फसगत झाली, असे लक्षात येत त्या तरुणाने पोलीस स्टेशनमध्ये सनी रमेश भोसलेच्या विरोधात तक्रार नोंदविली. भिवंडीत ऋषी असल्याचे भासवून घरात तंत्रमंत्र आणि पूजा करण्याच्या नावाखाली तसेच महिलेच्या घरातून नकारात्मक ऊर्जा पळवून नेण्याच्या नावाखाली तिला तीन भोंदू मांत्रिकांनी ५० हजाराचा गंडा घातल्याची घटना घडली आहे. ही घटना भिवंडीतील कशेळी भागातील एका इमारतीच्या फ्लॅटमध्ये घडली आहे. या प्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून नारपोली पोलिसांनी भामट्या त्रिकुट भोंदू मांत्रिकांविरोधात विविध कलमानुसार गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. छोटेलाल यादव, लालू यादव, हिरालाल यादव असे फरार झालेल्या भोंदू मांत्रिकांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भिवंडीतील कशेळी गावात असलेल्या सीजी पार्कच्या राजलक्ष्मी कॉम्प्लेक्समध्ये ललिता हरिकेश उपाध्याय (४८) नावाची महिला राहते. गेल्या काही दिवसांपासून या घरात काहीतरी विचित्र घडत आहे, असा ललिताचा असा समज झाला होता. याचाच फायदा घेऊन त्या महिलेला उत्तर प्रदेशातील भदोही जिल्ह्यातील रहिवासी असलेले भोंदू मांत्रिक छोटेलाल यादव, लालू यादव, हिरालाल यादव नावाच्या तिघांनी मिळून आधी ललिता यांना जादूटोणा तंत्रमंत्र विद्या करत असल्याची थाप मारून त्यांना विश्वासात घेतले. त्यानंतर त्या तिघांनीही त्या महिलेला सांगितले की, तुमच्या घरावर नकारात्मक शक्तींचा प्रभाव आहे. आम्ही सर्व ऋषी आणि मांत्रिक असल्याने तुमच्या घरातील नकारात्मक ऊर्जा काढून टाकून सुख आणि शांती आणू. यासाठी पूजापाठ करण्याची गरज आहे. पण यासाठी पूजा तुमच्या घरीच करावी लागेल.

## प्रासंगिक »

### आपण चुकतोय का?

***समाजात आज व्हिजिबल असणं खूप महत्त्वाचं झालं आहे.***

काही माणसं फार वेगळी असतात. आयुष्यभर त्यांचा गाजावाजा नसतो. पण ते समाजाच्या मुळांवर खोल परिणाम करून जातात. त्यांच्या नावाच्या घोषणा होत नाहीत, त्यांचा चेहरा पोस्टरवर येत नाही, पण त्यांनी उभं केलेलं काम काळाच्या कसोटीवर टिकतं. माधव गाडगीळ हे अशाच मोजक्या व्यक्तींमध्ये मोडतात. पर्यावरण, विकास, स्थानिक स्वराज्य आणि लोकसहभाग या संकल्पनांवर त्यांनी केलेलं कार्य केवळ अभ्यासकांसाठी नव्हे, तर संपूर्ण देशासाठी मार्गदर्शक ठरणारं आहे. पण जेव्हा अशा व्यक्तीचं निधन होतं, तेव्हा समाजाचं वास्तव उघडं पडतं. माधव गाडगीळ गेले. पुण्यासारख्या सुशिक्षित, सांस्कृतिक शहरात ते राहत होते. तरीही त्यांच्या अंत्यदर्शनासाठी लोकांची गर्दी उसळली नाही. शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले नाहीत. राजकीय नेते प्रचारात व्यस्त राहिले, पण दर्शनाला आले नाहीत. या सगळ्या घटना एकत्र पाहिल्या तर एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतोय की, आपण कुठे चुकतोय.

मकर संक्रांत हा भारतीय संस्कृतीतील एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि पवित्र सण मानला जातो. भारतीय परंपरा आणि रितीरिवाजांनुसार हा काळ अत्यंत शुभ, फलदायी मानला जातो. या सणाचा थेट संबंध शेती आणि सुगीच्या हंगामाशी आहे. या सणामागचा मुख्य उद्देश समृद्धी, सकारात्मकता आणि आनंदाचा प्रसार करणे हाच असतो.

# मकर संक्रांतीचं आनंदगान



संक्रांत हा भारतीय संस्कृतीतील म एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि पवित्र सण मानला जातो. खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. याला 'मकर संक्रमण' असे संबोधले जाते. भारतीय परंपरा आणि रितीरिवाजांनुसार हा काळ अत्यंत शुभ, फलदायी मानला जातो. संपूर्ण भारतात हा सण विविध नावांनी आणि आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला जात असला, तरी त्याचा थेट संबंध कृषी जीवनाशी, ग्रामीण लोकसंस्कृतीशी आणि सुगीच्या हंगामाशी आहे. या सणामागचा मुख्य उद्देश समृद्धी, सकारात्मकता आणि आनंदाचा प्रसार करणे हाच असतो. हा सण प्रामुख्याने भारतीय बळीराजाचा असला, तरी समाजातील प्रत्येक घटक यात उत्साहाने सहभागी होतो. मकर संक्रांतीच्या निमित्ताने सूर्याचे होणारे राशी परिवर्तन विश्वाला सकारात्मक ऊर्जा प्रदान करते आणि मानवाला नवीन सुरुवातीसाठी प्रोत्साहित करते, अशी जनमानसात धारणा आहे. या सणाला सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पौराणिक अशा त्रिविध पैलूंची जोड लाभलेली आहे. आध्यात्मिक स्तरावर सूर्याचे हे संक्रमण प्रार्थना, धार्मिक विधी आणि साधना करण्यासाठी अत्यंत फलदायी मानले जाते. सांस्कृतिक दृष्ट्या हा निसर्गाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा सोहळा आहे. ऐतिहासिक संदर्भांनुसार, हा उत्सव वैदिक काळापासून साजरा केला जात आहे. प्राचीन काळी राजे-महाराजे या दिवशी गोरगरिबांना दानधर्म करत आणि मोठ्या मेजवान्यांचे आयोजन करत असत. पौराणिक कथांनुसार, महाभारतातील भीष्म पितामहांनी आपला देह त्यागण्यासाठी याच शुभ काळाची निवड केली होती. विज्ञान आणि पर्यावरण मकर संक्रांतीमागे एक ठोस खगोलशास्त्रीय कारण दडलेले आहे. या दिवशी 'विंटर सॉल्स्टिस' म्हणजेच हिवाळ्यातील सर्वात लहान दिवसाचा काळ संपून सूर्य उत्तरायणाकडे झुकू लागतो. याचाच अर्थ पृथ्वी सूर्याच्या जवळ येऊ लागते आणि दिवसाचा कालावधी रात्रीपेक्षा मोठा होऊ लागतो. विज्ञानाच्या दृष्टीने हे उन्हाळ्याच्या आगमनाचे प्रतीक आहे. सूर्याच्या या उत्तर दिशेकडील प्रवासाचा पृथ्वीवरील ऋतूचक्र आणि हवामानावर मोठा परिणाम होतो. वाढलेली उष्णता आणि सूर्यप्रकाश पिकांच्या वाढीसाठी अत्यंत पोषक असतो, म्हणूनच शेतकऱ्यांसाठी हा सुगीचा काळ ठरतो. निसर्गातील या बदलामुळे शिशिरातील पानगळ थांबून झाडांना नवी पालवी फुटू लागते, फुले फुलतात आणि संपूर्ण परिसंस्था पुन्हा चैतन्यमय होते. परंपरा, रितीरिवाज आणि सामाजिक महत्त्व प्राचीन काळापासून संक्रांतीच्या दिवशी पहाटे लवकर उठून पवित्र नद्यांमध्ये स्नान करण्याची आणि सूर्याला अर्घ्य देण्याची परंपरा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## गुजरातमधून घरं मिळणार

## राज ठाकरेंचा मराठी माणसाला इशारा

# आज जर चुकलात तर कायमचे मुकलात!

### मराठी माणसासाठी शेवटची निवडणूक



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईसह राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये येत्या १५ तारखेला मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रचाराला वेग आला आहे. या पार्श्वभूमीवर आज मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर ठाकरे बंधूंची संयुक्त सभा झाली. या सभेत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली. तसेच यावेळी राज ठाकरे यांनी मुंबई महानगरपालिका निवडणूक ही मराठी माणसासाठी शेवटची निवडणूक असल्याचा इशारा दिला आहे.**

राज ठाकरे शिवतीर्थावर बोलताना म्हणाले की, "गुजरातमधून येणाऱ्यांना घरं मिळणार, तुम्हाला नाकारली जाणार. तुम्हीच नसाल तर या महानगरपालिकेचं काय करायचं? आम्ही आमच्या वचननाम्यामध्ये सांगितलेल्या अनेक गोष्टी उत्तम करू, शहर उत्तम करू, पण त्यासाठी तुम्ही असायला पाहिजेत ना? कोण महाराष्ट्रातला मराठी माणूस? पैसा फेकला की विकला जातो. ही आपली किंमत. आणि बोली लावणारे कोण? आमचेच. दुसऱ्यांच्या हातावरती बसून त्यांचा उद्देश साध्य करण्यासाठी आमचे लोकं हे आमच्याच लोकांना फोडतायत. काय दुर्दैव आहे. अशा परिस्थितीत ही निवडणूक होत आहे," असे राज ठाकरे म्हणाले. "मराठी माणसासाठी ही शेवटची निवडणूक आहे. आज जर चुकलात तर कायमचे मुकलात म्हणून समजा. आज जर तुमच्या हातातून ही शहरं गेली, उद्या राजानं मारलं आणि पावसाने झोडलं तर तक्रार कुणाकडे करायची?आज इतर राजकीय पक्षातील जे मराठी लोकं आहेत माझे त्यांनाही आवाहन आहे, सोडा ते सगळं. या मराठी माणसासाठी एक व्हा, या मुंबईसाठी एक व्हा, या महाराष्ट्रासाठी एक व्हा," असे राज ठाकरे म्हणाले.

इतक्या वर्षांच्या परंपरेने ही मुंबई महाराष्ट्राला मिळाली. १०७ हुतात्मे गेले. उद्या मुंबई गेली तर त्या पुतळ्यांना तरी काय अर्थ उरतो? ते पुतळे काय म्हणतील? आमचा मराठी माणूस बेसावध राहिला आणि म्हणून आम्ही मिळवलेली मुंबई आम्हाला गमवावी लागली. आज तुमच्यासमोर ही सोन्यासारखी संधी आली आहे. आम्ही सत्तेचं काय करू... सत्तेशिवायपण लाथा मारल्याच ना, अंगावर आले त्यांना तुडवलेच ना? पण तुम्हाला या निवडणुकीमध्ये या सत्ताधाऱ्यांचा माज उतरवायचा आहे. कुठेही बेसावध राहू नका, इव्हीएमवरती लक्ष ठेवा," असेही राज ठाकरे म्हणाले.महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या प्रचाराच्या माध्यमातून आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. त्यामुळे राज्यातील राजकारण चांगलंच तापल्याचं पाहायला मिळत आहे. यातच आज मुंबईत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांची संयुक्त सभा पार पडली.

या सभेत बोलताना राज ठाकरे यांनी शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या युतीमुळे काही पदाधिकाऱ्यांना आणि कार्यकर्त्यांना उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या कार्यकर्त्यांची जाहीर सभेत दिलगिरी व्यक्त केली."आम्ही २० वर्षांनंतर युती करत आहोत. या युतीमुळे अनेकांना उमेदवारी देता आली नाही, त्यामुळे अनेकजण नाराज झाले. काही जणांना वाटलं दुसऱ्या पक्षात जावं, काही नाराज झाले, काही दुखावले अशा अनेक गोष्टी झाल्या. अशा गोष्टी होत असतात, आमच्याही काही गोष्टी हातात नसतात. मात्र, त्यांना दुखावण्याचा कोणताही हेतू नव्हता. पण तरीही जर ते नाराज झाले असतील तर त्यांची मी दिलगिरी व्यक्त करतो", असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे."अकोटमध्ये भाजपाने एमआयएमबरोबर युती केली. बदलापूरमध्ये भाजपाने कॉंग्रेसबरोबर युती केली, तर ६६ जण बिनविरोध निवडून आले. आज ६६ बिनविरोध नगरसेवक निवडून आले, पण हे आकडे पुढे आणखी वाढत जातील. वाईट वाटतं की लोक विकले जातात.

### या महाराष्ट्रासाठी एक व्हा

एका व्यक्तीला स्वीकृत नगरसेवक केलं. ही हिम्मत कुठून आली, हा उद्दामपणा, ही मस्ती कुठून आली?", अशी टीका राज ठाकरे यांनी भाजपावर केली.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते तेव्हा छगन भुजबळांना तुरुंगात टाकलं होतं. अजित पवारांच्या विरोधात बैलगाडी भर पुरावे देवेंद्र फडणवीस घेऊन गेले होते, आता हे दोघंही फडणवीसांसह सत्तेत आहेत. मराठी माणसांचा टक्का कमी करायचा.

# मी सहा हजार देतो, कोस्टल रोडवर जा

## आमदार आदित्य ठाकरेंचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना प्रतिआव्हान!



। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मुंबईतील कोस्टल रोडवरून श्रेयवादाची लढाई सुरू झाली आहे. देवेंद्र फडणवीसांच्या नेतृत्वाखालील सरकारने कोस्टल रोड पूर्ण केल्याचा दावा भाजपाने केला आहे. तर, कोस्टल रोड उद्धव ठाकरेंमुळे पूर्ण झाल्याचा दावा ठाकरे बंधूंनी केला आहे. यावरून दोन्हींकडून एकमेकांना आव्हान-प्रतिआव्हानही देण्यात आलं.**

आता उद्धव ठाकरेंचे चिरंजीव आमदार आदित्य ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीसांना आव्हान दिलं आहे."विकामकामांवर बोला, मी हजार रुपये देतो", असं आव्हान देवेंद्र फडणवीस यांनी प्रचारसभेतील भाषणांमध्ये केलं होतं. तसंच प्रत्येक भाषणात ही रक्कम वाढवत जात पाच हजार रुपयांपर्यंत नेली होती. दरम्यान, अनेक भाषणांमध्ये देवेंद्र फडणवीसांनी मुंबईतील कोस्टल रोड प्रकल्पाचेही श्रेय घेतले. यावरून आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

"मुंबई महापालिकेची निवडणूक ही वॉटर, गटर, मीटरची निवडणूक आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत आपण केलेली कामे दाखवतो. भाजपावाले म्हणतात की आम्ही काहीच केलं नाही. इथे महापौर, उपमहापौर, नगरसेवकांना विचारा. झोपेतून उठून विचारलं तरीही मी सांगू शकतो की २५ वर्षांत काय केलं", असं आदित्य ठाकरे म्हणाले.

१९९७ मध्ये सत्ता आली तेव्हा मुंबई पालिकेत ६०० कोटींची तूट होती. ती तूटभरून काढली. हे आपलं आर्थिक नियोजन आहे. हे नियोजन मुंबईत जोपासण्याची प्रथा पाळत आलो आहोत. पण त्या ठेवींचं तुम्ही काय केलंत?", असा प्रतिप्रश्न आदित्य ठाकरेंनी केला."देवेंद्र फडणवीस मला तीन हजार रुपये देणार आहेत, मला ते तीन हजार नको. तुम्ही लाडक्या बहिणींना २१०० रुपये देणार होतात, ते द्या. मी सहा हजार रुपये देतो, तुम्ही माझ्याबरोबर कोस्टल रोडवर चला", असं प्रतिआव्हान आदित्य ठाकरे यांनी दिलं.आपल्या मुंबईत जी आरोग्यसेवा आहे, ती सेवा इतर जगात कुठेही नसेल. मुंबई महापालिकांमध्ये आरोग्यसेवांना प्राधान्य देण्यात आलं आहे. मुंबई महापालिकेचे स्वतःचं रुग्णालय आहे, ओपीडी आहे, ट्रॉमा केअर सेंटर्स आहेत. याचा आपल्याला अभिमान असायला पाहिजे. मुंबई महापालिकांच्या शाळेत आठ माध्यमांतून शिक्षण दिलं जातं. या शाळांमधून सव्वातीन लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. मुलांच्या दप्तरांचं ओझं कमी होण्याकरता टॅब्स देण्यात आले.

### ६०० कोटींची तूट भरून काढली

शाळांमध्ये मराठी अनिवार्य करण्यात आलं. आता पालिकांच्या शाळांतील गळती थांबवली असून ४ हजार जागांसाठी १० हजार विद्यार्थी रांगेत आहेत, असं आदित्य ठाकरे म्हणाले."मुंबई महापालिकेची निवडणूक ही वॉटर, गटर, मीटरची निवडणूक आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत आपण केलेली कामे दाखवतो.

## अन्यथा पैशाचा पुरवठा बंद

## डोनाल्ड ट्रम्प यांनी कोलंबियालाही धमकी दिली

# उशीर होण्यापूर्वी अमेरिकेशी करार करा

## ट्रम्प यांनी तीन देशांना दिला इशारा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मेरिकेने व्हेनेझुएलावर हवाई हल्ला करत व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना काही दिवसांपूर्वी अटक केलं. अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या कारवाईचा जगातील अनेक देशांनी निषेध व्यक्त केला. व्हेनेझुएलावरील कारवाईनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कोलंबियालाही थेट लष्करी कारवाईची धमकी दिली होती. त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी क्यूबा देशाला धमकी दिली आहे. 'क्युबाने खूप उशीर होण्यापूर्वी अमेरिकेशी करार करावा, अन्यथा त्यांचा तेल आणि पैशाचा पुरवठा पूर्णपणे बंद केला जाईल', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे.**



"क्युबाला आता तेलाचा एक थेंब किंवा एक डॉलरही मिळणार नाही. खूप उशीर होण्यापूर्वी क्युबाने अमेरिकेशी करार करावा", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रुथ सोशलवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. दरम्यान, क्युबाच्या अध्यक्षांनी अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या कारवाईवर टीका केल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी हा इशारा दिला आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकारांशी संवाद साधताना कोलंबियाच्या सरकार विरुद्ध थेट लष्करी कारवाईची धमकी दिली होती. डोनाल्ड ट्रम्प म्हणाले होते की, "कोलंबिया देखील खूप आजारी आहे. ज्यावर एका आजारी व्यक्तीचं राज्य आहे, ज्याला कोकेन बनवायला आणि ते अमेरिकेला विकायला आवडतं. मात्र, ते तो जास्त काळ करू शकणार नाही", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं होतं. यावेळी एअर फोर्स वनमध्ये पत्रकारांनी ट्रम्प यांना प्रश्न विचारला होता की, अमेरिका देशाविरुद्ध (कोलंबिया) लष्करी कारवाई करणार का? या प्रश्नावर उत्तर देताना डोनाल्ड ट्रम्प म्हणाले होते की, "मला ते योग्य वाटतं."ट्रम्प यांनी दिलेल्या धमकीनंतर कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी देखील डोनाल्ड ट्रम्प यांना खुलं आव्हान दिलं. 'हिंमत असेल तर मला पकडा', असं कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी म्हटलं. सेच अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या हल्ल्यावरून गुस्तावो पेट्रो यांनी ट्रम्प यांच्यावर टीका केली.व्हेनेझुएला या देशावर हल्ला केल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी आणखी तीन देशांना थेट इशारा दिलेला आहे. ड्रग्स उत्पादन करणाऱ्यांना आश्रय देणाऱ्या लॅटिन अमेरिकेतील मेक्सिको, क्युबा आणि कोलंबिया या देशांना डोनाल्ड ट्रम्प यांनी इशारा दिला असून वेनेझुएलानंतर तुमच्या देशांवर हल्ले होऊ शकतात असं डोनाल्ड ट्रम्प म्हटलेलं आहे.मेरिकेने व्हेनेझुएलावर हवाई हल्ला करत व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना काही दिवसांपूर्वी अटक केलं. अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या कारवाईचा जगातील अनेक देशांनी निषेध व्यक्त केला. व्हेनेझुएलावरील कारवाईनंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कोलंबियालाही थेट लष्करी कारवाईची धमकी दिली होती. त्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी क्यूबा देशाला धमकी दिली आहे. 'क्युबाने खूप उशीर होण्यापूर्वी अमेरिकेशी करार करावा, अन्यथा त्यांचा तेल आणि पैशाचा पुरवठा पूर्णपणे बंद केला जाईल', असं डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. "क्युबाला आता तेलाचा एक थेंब किंवा एक डॉलरही मिळणार नाही. खूप उशीर होण्यापूर्वी क्युबाने अमेरिकेशी करार करावा", असं डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्म ट्रुथ सोशलवरील पोस्टमध्ये म्हटलं आहे. दरम्यान, क्युबाच्या अध्यक्षांनी अमेरिकेने व्हेनेझुएलावर केलेल्या कारवाईवर टीका केल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी हा इशारा दिला आहे.डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांपूर्वी पत्रकारांशी संवाद साधताना कोलंबियाच्या सरकार विरुद्ध थेट लष्करी कारवाईची धमकी दिली होती.

### डोनाल्ड ट्रम्प काय म्हणाले?

यावेळी एअर फोर्स वनमध्ये पत्रकारांनी ट्रम्प यांना प्रश्न विचारला होता. की, अमेरिका देशाविरुद्ध (कोलंबिया) लष्करी कारवाई करणार का? या प्रश्नावर उत्तर देताना डोनाल्ड ट्रम्प म्हणाले होते की, "मला ते योग्य वाटतं."ट्रम्प यांनी दिलेल्या धमकीनंतर कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांनी देखील डोनाल्ड ट्रम्प यांना खुलं आव्हान दिलं.

# उत्तर भारतात पुन्हा थंडीची लाट

## राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेशच्या काही भागाला ऑरेंज अलर्ट

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य आशिया आणि हिमालयामधून आलेल्या शीत वाऱ्यांमुळे उत्तर भारत पुन्हा कडाक्याची थंडी पडली आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील तीन दिवस राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांना थंडीच्या लाटेचा इशारा दिला आहे.**

उत्तर प्रदेश, उत्तराखंडमध्ये थंडीच्या लाटेसाठी लाल अलर्ट, तर पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेशच्या काही भागाला ऑरेंज अलर्ट दिला आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १६ जानेवारीपर्यंत उत्तर भारतात थंडीच्या लाटेची स्थिती कायम राहणार आहे. या काळात उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड, बिहार, पंजाब या राज्यांमध्ये सकाळी दाट धोके पडण्याची शक्यता आहे. या दाट धुक्यामुळे दृश्यमानता ५० ते २०० मीटर इतकी कमी राहण्याची शक्यता आहे. हरियाणा, आसाम, जम्मूच्या काही भागांत आणि हिमाचल प्रदेश, राजस्थानच्या काही भागांमध्ये पहाटेच्या वेळेला दाट धुक्याची शक्यता आहे. उत्तर भारतातील दृश्यमानता सरासरी ५० ते २०० मीटरपर्यंत राहील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.मागील २४ तासांत



जम्मू, काश्मीर, लडाखमध्ये बहुतांश ठिकाणी तापमान शून्य अंश सेल्सिअपेक्षाही कमी राहिले होते. हिमाचल प्रदेशमधील काही भागात आणि उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थानमध्येही पारा अनेक ठिकाणी एक ते पाच अंश सेल्सिअस दरम्यान राहिला. मध्य प्रदेश, ओदिशा, बिहार, पूर्व राज्यस्थान, गुजरात झारखंड, पश्चिम बंगाल आणि मध्य महाराष्ट्रामध्ये पारा पाच ते दहा अंश सेल्सिअसच्या दरम्यान होता.उत्तरेकडील थंड वाऱ्याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील तापमान सरासरीपेक्षा तीन ते सहा अंश सेल्सिअसने कमी झाले होते. पुढील दोन दिवस महाराष्ट्रात तापमान थोडीशी वाढ होण्याची शक्यता आहे. मकर संक्रांतीच्या सणाच्या काळात थंडी कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. उत्तरेकडील थंडीचा महाराष्ट्रात फार परिणाम होणार नसला तरी तापमान सरासरी इतके किंवा त्याच्यापेक्षा कमीच राहील, असा अंदाजही हवामान विभागाने वर्तविला आहेविरून जाण्याची शक्यता आहे. पण, या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे तमिळनाडूच्या किनारपट्टीवरील काही भागांमध्ये हलका पाऊस झाल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

### महाराष्ट्रातील स्थिती काय...

उत्तर भारत पुन्हा कडाक्याची थंडी पडली आहे. भारतीय हवामान विभागाने पुढील तीन दिवस राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांना थंडीच्या लाटेचा इशारा दिला आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंडमध्ये थंडीच्या लाटेसाठी लाल अलर्ट, तर पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेशच्या काही भागाला ऑरेंज अलर्ट दिला आहे.

## 9.7 रेटिंग असलेली सत्य घटनेवर आधारित




ओटीटी नवीन कोणताही चित्रपट किंवा वेब सीरिज रिलीज झाली की चाहत्यांमध्ये त्याबद्दल चर्चा होत असते. नुकतीच एका सत्यकथेवर आधारित सीरिज ओटीटीवर प्रदर्शित झाली. जर तुम्ही या वीकेंडला काय पाहायचं, असा विचार करत असाल तर ही सीरिज ओटीटीवर पाहू शकता. विशेष म्हणजे, या सीरिजला आयएमडीबीवर टॉप रेटिंग मिळाले आहे. सत्य घटनांवर आधारित सीरिज ओटीटीवर खूप लोकप्रिय आहेत. नुकतीच प्रदर्शित झालेली वेब सीरिज सध्या खूप जास्त चर्चेत आहे. 'हनीमून से हत्या' असं या डॉक्युमेंटरी-वेब सीरिजचं नाव आहे. ही सीरिज महिलांनी पतीला संपवण्याबद्दल आहे. या सीरिजमध्ये हत्या प्रकरणं दाखवण्यात आली आहेत. यातील काही प्रकरणांची खऱ्या आयुष्यात मोठ्या प्रमाणात चर्चा झाली आहे. या भयानक घटनांनी सर्वांनाच धक्का बसला. या सीरिजमध्ये सोनम रघुवंशी केस, मेरठ ब्लू ड्रम केस आणि दिल्ली इलेक्ट्रिक शॉक केससह असंख्य घटनांचे चित्रण करण्यात आले आहे. ही सीरिज पुरुषांच्या हत्येमागील सत्य आणि मानसिकता शोधून काढते. ही सीरिज ९ जानेवारी रोजी OTT प्लॅटफॉर्म ZEE5 वर प्रदर्शित झाली आणि ती लवकरच चर्चेत आली. अजितेश शर्मा दिग्दर्शित या सीरिजला IMDB वर १० पैकी ९.७ रेटिंग मिळाले आहे. रिलीज होण्यापूर्वीच या सीरिजच्या ट्रेलरचे खूप कौतुक झाले होते होते. आता सीरिजही प्रेक्षकांच्या पसंतीस पडली आहे. महिला त्यांच्या पतींबरोबर अशा का वागतात, प्रियकरांसाठी पतीचे खून का करतात, त्यामागे त्यांची मानसिकता कशी आहे, अशा अनेक प्रश्नांची कारणं शोधण्याचा प्रयत्न या मालिकेत करण्यात आला आहे.हनीमून हे हत्या' ही सीरिज ओटीटी चाहत्यांमध्ये प्रचंड लोकप्रियता मिळवत आहे आणि सोशल मीडियावरही ती चर्चेत आहे. जर तुम्ही ती अजून पाहिली नसेल, तर तुम्ही या आठवड्याच्या शेवटी ती पाहू शकता.२३ मे २०२५ रोजी, राजा रघुवंशी आणि सोनम रघुवंशी हे मध्य प्रदेशातील इंदूर येथील विवाहित जोडपे मेघालयमध्ये त्यांच्या हनीमूनवर असताना गायब झाले.

## 'मुरांबा' फेम अभिनेत्रीने सांगितला संघर्षकाळ

इंडस्ट्रीत असे बरेच कलाकार आहेत ज्यांचं मनोरंजनविश्वात कोणीही नसताना आणि अभिनय क्षेत्रात काम करण्यासाठी त्यांना आई-वडिलांनी विरोध केला असताना त्यांनी स्वबळावर स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. असंच काहीसं घडलं 'मुरांबा' मालिकेतील अभिनेत्रीबरोबर. साकारात घराघरांत पोहोचलेली अभिनेत्री म्हणजे निशाणी बोरुले. निशाणीने यामध्ये रेवा ही खलनायिकेची भूमिका साकारली. पण, तुम्हाला माहीत आहे का निशाणीला या क्षेत्रात नवीन असताना खूप संघर्ष करावा लागला होता; तर तिला तिच्या पालकांनी आधी विरोधही केला होता. याबद्दल तिने 'राजश्री मराठी'ला दिलेल्या मुलाखतीत सांगितलं आहे. निशाणी मुलाखतीत तिच्या संघर्षकाळाबद्दल म्हणाली, "मला मुंबईत येऊन पाच वर्ष झाली आहेत. २०१९ च्या शेवटी घरच्यांशी भांडून पाच बॅग्स घेऊन आले होते, कारण त्यांना असं वाटत होतं की मी इंजिनियरिंगची डिग्री घेतलीये तर मी त्यातच नोकरी करावी. जसं एरवी सगळेच घरचे विचार करतात. तेव्हा तर मला ऑडिशन काय असतं, कोणाला भेटावं लागतं याबद्दल आधी माहीतच नव्हतं."शिवानी पुढे म्हणाली, "घरच्यांशी थोडं भांडण झालं. मी म्हटलं की आता डिग्री मिळाली ना, केलं ना तुमच्या मनासारखं, मग मला माझ्या मनासारखं आता करू द्या ना. तेव्हा त्यांनी मला सहा महिन्याचा कालावधी दिला होता की जर सहा महिन्यांत तुझं काही झालं नाही तर मग तुला यावं लागणार आहे पुण्यात आणि मग आपण बघू पुढे काय करायचं ते. मग सहा महिने मी आले, पण मी खूप हट्टी होते मी गेलेच नाही परत. मी आई-बाबांना म्हटलं की सहा महिन्यात मला डिग्री मिळाली का, सहा वर्ष लागली ना; तेव्हा जाऊन मी इंजीनीयर झाले. मग सहा महिन्यांत मी अभिनेत्री कशी होऊ शकते. हा माझा प्रवास आहे आणि मला आवडतंय हे, करू द्या मला. मग त्यांना जाणवलं की मुलीमध्ये जिद्द आहे, मग त्यांनीही परवानगी दिली." शिवानी पुढे म्हणाली, "माझा प्रवास सुरू झाला, मग काय यश-अपयश सुरूच असतं. जवळपास जमून आलेल्या गोष्टी अचानक त्याचं पुढे काहीच होत नाही.



## प्रियांका घेते तिच्या त्वचेची काळजी?

प्रियांका चोप्राने बॉलीवूडमध्ये 'द हिरो: लव्ह स्टोरी ऑफ स्पाय' या चित्रपटातून पदार्पण केले होते. हा चित्रपट २००३ ला प्रदर्शित झाला होता. २००३ ला प्रदर्शित झालेल्या अंदाज या चित्रपटातून तिला मोठ्या प्रमाणात लोकप्रियता मिळाली. 'बर्फी', 'फॅशन', 'सात खून माफ', 'ऐतराज', 'फॅशन', 'मेरी कोम', 'कमिने', 'डॉन', दोस्ताना, अग्नीपथ, दिल धडकने दो, अग्नीपथ, क्रिश, मुझसे शादी करोगी, यकीन, अंजाना अंजानी अशा अनेक चित्रपटातून अभिनेत्रीने प्रेक्षकांचे मनोरंजन केले आहे. सध्या ती बॉलीवूडबरोबर तमिळ आणि हॉलीवूडमध्येही काम करत आहे. प्रियांका चोप्रा सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. तिच्या शूटिंगच्या ठिकाणचे विविध व्हिडीओ ती शेअर करते. ती तिच्या मुलीचेदेखील अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर करते. तसेच, तिच्या आईबरोबरचे काही व्हिडीओ शेअर करते. काही वेळा ती आठवणींना उजाळा देते.पती निक जोनासबरोबर जेव्हा ती सुट्ट्यांसाठी विविध ठिकाणी जाते, त्यावेळचे व्हिडीओदेखील लक्ष वेधून घेतात. तसेच तिच्या आयुष्यातील अनेक छोट्या-मोठ्या गोष्टी ती शेअर करत असते. नुकताच प्रियांका चोप्राने सोशल मीडियावर व्हिडीओ शेअर केला आहे. तो व्हिडीओ सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे.

## 'अशोक मा.मा.' मालिकेने घेतला प्रेक्षकांचा निरोप

येत्या १० जानेवारी रोजी मालिकेचा शेवटचा भाग प्रसारित होईल. मालिका संपत असल्यानं अनेक कलाकार भावुक होत आपल्या भावना व्यक्त करीत आहेत. अशातच मुख्य अभिनेत्री रसिका वाखारकरनं अशोक सराफ यांच्यासाठी एक भावुक पोस्ट शेअर केली आहे येत ११ जानेवारीपासून कलर्स मराठीवर 'बिग बॉस मराठी'चं सहावं पर्व सुरू होत आहे. रविवारी ग्रँड प्रीमियर झाल्यानंतर पुढचे १०० दिवस हा शो प्रसारित होईल. त्यामुळे साहजिकच वाहिनीवरील मालिकांच्या वेळेत बदल होत आहे. त्यात आता 'अशोक मा.मा.' ही मालिका प्रेक्षकांचा निरोप घेत आहे. 'अशोक मा.मा.' मालिका प्रेक्षकांचा निरोप घेताच मुख्य अभिनेत्री रसिका वाखारकरनं ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्यासाठी भावुक पोस्ट शेअर केली आहे.



## सायली संजीवचा 'कैरी' सिनेमा अवघ्या महिनाभरात ओटीटीवर

ओटीटीमुळे प्रेक्षकांना अगदी घरबसल्या अनेक चित्रपटांचा आस्वाद घेता येतो. सिनेमागृहांत न चाललेले किंवा कमी चाललेले सिनेमे काही दिवसांतच ओटीटीवर येतात. त्यामुळे सिनेमागृहांत बघता न आलेले सिनेमे प्रेक्षकांना ओटीटीद्वारे पाहता येतात. असाच एक मराठी सिनेमा आता ओटीटीद्वारे प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. व सिद्धार्थ जाधव यांच्या मुख्य भूमिका असलेला 'कैरी' सिनेमा गेल्या महिन्यात सिनेमागृहांत रिलीज झाला होता. अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यानं आता हा सिनेमा ओटीटीवर प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाला आहे. शशांक केतकर, सायली संजीव व सिद्धार्थ जाधव यांचा 'कैरी' सिनेमा कधी आणि कोणत्या ओटीटी माध्यमावर पाहता येईल, चला जाणून घेऊ... मकर संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर एका आंबट-गोड प्रवासाची कहाणी प्रेक्षकांना घरबसल्या पाहायला मिळणार आहे. अल्ट्रा मीडिया अँड एन्टरटेन्मेंट प्रस्तुत आणि शंतनू रोडे दिग्दर्शित 'कैरी' हा चित्रपट १४ जानेवारीला अल्ट्रा झकास या मराठी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. १२ डिसेंबर २०२५ रोजी 'कैरी' सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला होता; पण या सिनेमाला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही. अशातच सिनेमा आता ओटीटीवर रिलीज होत आहे.लंडनमध्ये चित्रित झालेला 'कैरी' हा चित्रपट एका गावातील साध्या महिलेची (सायली संजीव) कथा सांगतो. नवऱ्याबरोबर (शशांक केतकर) बाहेरच्या शहरात आल्यानंतर तिचं आयुष्य पूर्णपणे बदलतं. त्यात नवरा अचानक बेपत्ता झाल्यानंतर अपरिचित शहरात एकटी पडलेली ही महिला अनेक सामाजिक आणि भावनिक अडचणींना सामोरी जाते. नवऱ्याचा शोध घेत असताना ती स्वतःला ओळखण्याचा आणि खंबीरपणे उभं राहण्याचा प्रवास करते.सायली संजीवने संयमी

**कोहलीची ९३ धावांची खेळी** पहिल्या वनडेत न्यूझीलंडवर ४ गडी राखून मात

# रोमांचक सामन्यात इंडियाचा विजय!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि न्यूझीलंडमधील याच्यांतील तीन एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना आज वडोदरा येथील बीसीए स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ४ विकेट राखून पराभव केला. त्याआधी नाणेफेक गमावल्यानंतर न्यूझीलंडने निर्धारित ५० षटकांत आठ गडी गमावून ३०० धावा केल्या आणि भारतासमोर ३०१ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने ४९ व्या षटकात षटकार मारुन विजय नोंदवला आणि मालिके १-० ने आघाडी घेतली आहे. भारताकडून विराट कोहलीने सर्वाधिक ९३ धावा केल्या, तर शुभमन गिलनेही अर्धशतक झळकावले. २०२६ मधील भारताचा हा पहिला विजय आहे.**

## कोहलीची ९३ धावांची खेळी



प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडला चांगली सुरुवात मिळाली. डेव्हॉन कॉनवे (६७ चेंडूत ५६) आणि हेन्री निकोल्स (६९ चेंडूत ६२) यांनी पहिल्या विकेटसाठी ११७ धावा जोडल्या. विल यंग (१२) आणि ग्लेन फिलिप्स (१२) स्वस्तात बाद झाले. कर्णधार मायकेल ब्रेसवेल १६ धावांवर धावबाद झाला. तथापि, चौथ्या क्रमांकावर आलेल्या डॅरिलने दुसऱ्या टोकाला ठामपणे धरले. त्याने ब्रेसवेलसोबत सहाव्या विकेटसाठी ३९ धावा आणि ख्रिश्चन क्लार्क (नाबाद २४) यांच्यासोबत सातव्या विकेटसाठी ४२ धावा जोडल्या. काइल जेमिसन ८ धावांवर नाबाद राहिला. झाचेरी फौल्क्सने १ धाव केली. भारताकडून हर्षित राणा, मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी २ तर कुलदीप यादवने १ विकेट घेतली. भारत आणि न्यूझीलंडमधील सामना ४९ व्या षटकात गेला. एका क्षणी भारताचा विजय अटळ वाटत होता आणि कोहली शतक ठोकून संघाला विजयाकडे घेऊन जाईल हे निश्चित वाटत होते. तथापि, ४० व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर काइल जेमिसनने कोहलीला बाद करून भारताला मोठा धक्का दिला. त्याच षटकाच्या शेवटच्या चेंडूवर रवींद्र जडेजा स्वस्तात बाद झाला. त्यानंतर ४२ व्या षटकात श्रेयस अय्यर बाद झाला, ज्यामुळे टीम इंडिया अडचणीत आली. अय्यरच्या जाण्यानंतर वेगवान गोलंदाज हर्षित राणा मैदानात आला. राणाने २९ धावांची छोटी पण महत्त्वाची खेळी केली. त्यानंतर केएल राहुलने वॉशिंग्टन सुंदरसोबत मिळून ४९ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर षटकार मारला आणि भारताला ४ गडी राखून विजय मिळवून दिला. केएल २९ धावांवर नाबाद राहिला. भारत आणि न्यूझीलंडमधील याच्यांतील तीन एकदिवसीय मालिकेतील पहिला सामना आज

## न्यूझीलंडवर ४ गडी राखून मात

आणि कोहली शतक ठोकून संघाला विजयाकडे घेऊन जाईल हे निश्चित वाटत होते. तथापि, ४० व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर काइल जेमिसनने कोहलीला बाद करून भारताला मोठा धक्का दिला. त्याच षटकाच्या शेवटच्या चेंडूवर रवींद्र जडेजा स्वस्तात बाद झाला. त्यानंतर ४२ व्या षटकात श्रेयस अय्यर बाद झाला, ज्यामुळे टीम इंडिया अडचणीत आली. अय्यरच्या जाण्यानंतर वेगवान गोलंदाज हर्षित राणा मैदानात आला. राणाने २९ धावांची छोटी पण महत्त्वाची खेळी केली.

वडोदरा येथील बीसीए स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात भारताने न्यूझीलंडचा ४ विकेट राखून पराभव केला. त्याआधी नाणेफेक गमावल्यानंतर न्यूझीलंडने निर्धारित ५० षटकांत आठ गडी गमावून ३०० धावा केल्या आणि भारतासमोर ३०१ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. लक्ष्याचा पाठलाग करताना भारताने ४९ व्या षटकात षटकार मारुन विजय नोंदवला आणि मालिके १-० ने आघाडी घेतली आहे. भारताकडून विराट कोहलीने सर्वाधिक ९३ धावा केल्या, तर शुभमन गिलनेही अर्धशतक झळकावले. २०२६ मधील भारताचा हा पहिला विजय आहे. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडला चांगली सुरुवात मिळाली. डेव्हॉन कॉनवे (६७ चेंडूत ५६) आणि हेन्री निकोल्स (६९ चेंडूत ६२) यांनी पहिल्या विकेटसाठी ११७ धावा जोडल्या. विल यंग (१२) आणि ग्लेन फिलिप्स (१२) स्वस्तात बाद झाले. कर्णधार मायकेल ब्रेसवेल १६ धावांवर धावबाद झाला. तथापि, चौथ्या क्रमांकावर आलेल्या डॅरिलने दुसऱ्या टोकाला ठामपणे धरले. त्याने ब्रेसवेलसोबत सहाव्या विकेटसाठी ३९ धावा आणि ख्रिश्चन क्लार्क (नाबाद २४) यांच्यासोबत सातव्या विकेटसाठी ४२ धावा जोडल्या. काइल जेमिसन ८ धावांवर नाबाद राहिला. झाचेरी फौल्क्सने १ धाव केली. भारताकडून हर्षित राणा, मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी २ तर कुलदीप यादवने १ विकेट घेतली.भारत आणि न्यूझीलंडमधील सामना ४९ व्या षटकात गेला. एका क्षणी भारताचा विजय अटळ वाटत होता.

# विराट कोहलीचा वर्ल्ड रेकॉर्ड

## विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये बनवला महारेकॉर्ड

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय क्रिकेट संघाचा दिग्गज फलंदाज विराट कोहलीने आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात २५ धावा करताच तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८,००० धावा करणारा जगातील सर्वात जलद फलंदाज बनला.**



कोहलीने सर्वात कमी वेळेत (६२४ डाव) हा टप्पा गाठला, जो स्वतःच एक जागतिक विक्रम आहे. त्याने त्याच्या खेळीदरम्यान ४४ चेंडूत एकूण सहा चौकार मारून अर्धशतकही पूर्ण केले. त्याने आता ३०९ एकदिवसीय सामन्यांमध्ये १४,६०० धावांचा टप्पा ओलांडला आहे, ज्यामध्ये ५३ शतके आणि ७७ अर्धशतके आहेत.आजपर्यंत, आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये फक्त दोनच खेळाडूंनी २८,००० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत: दिग्गज सचिन तेंडुलकर आणि श्रीलंकेचा दिग्गज कुमार संगकारा. सचिन तेंडुलकरने सर्वात कमी डावांमध्ये हा टप्पा गाठला, ६४४ डावांमध्ये २८,००० धावा पूर्ण केल्या, ७८२ डावांमध्ये ३४,३५७

## विराटचा क्रमांक दुसरा

विराट संगकाराला मागे टाकत या बाबतीत दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक धावा करणारा फलंदाज बनला आहे.कोहलीने त्याच्या कारकिर्दीत १२३ कसोटी सामन्यांमध्ये ९,२३० धावा आणि १२५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ४,१८८ धावा केल्या आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत त्याच्या पुढे फक्त एकच फलंदाज आहे.

धावा केल्या.दुसरीकडे, कुमार संगकाराने त्याच्या कारकिर्दीच्या शेवटच्या डावात २८,००० धावांचा टप्पा गाठला. त्याने ६६६ डावात २८,०१६ धावा केल्या आणि २०१५ मध्ये भारताविरुद्ध त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना खेळला.विराट कोहली एवढ्यावरच थांबला नाही; त्याने त्याच्या २८,००० धावांच्या टप्प्यात १७ धावा जोडल्या आणि कुमार संगकाराला क्रिकेटमध्ये दुसरा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू बनला.न्यूझीलंडविरुद्धच्या मालिकेतील पहिल्या एकदिवसीय सामन्यापूर्वी, विराट कोहलीने ५५६ आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या ६२३ डावांमध्ये ५२.५८ च्या सरासरीने २७,९७५ धावा केल्या होत्या.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
epaper.mahaenews.com
। सोमवार ।
दि. 12 जानेवारी 2026
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## नव्या युगाचे नेतृत्व, विकासाचा नवा ध्यास

# आशाताई भोंडवे यांचा ‘व्हिजनरी’ जाहीरनामा!

### प्रश्नांची खोल समज, त्यावर ठोस उपाय आणि लोकांशी थेट संवाद साधणारे नेतृत्व आशाताई भोंडवे

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**राजकारणात आश्वासनांची रेलचेल असते; मात्र प्रश्नांची खोल समज, त्यावर ठोस उपाय आणि लोकांशी थेट संवाद साधणारे नेतृत्व विरळाच. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार आशाताई भोंडवे यांनी आपला प्रभागस्तरीय जाहीरनामा (MICRO-MANIFESTO) जाहीर करून, केवळ राजकारण नव्हे तर सेवेचा नवा आदर्श निर्माण केल्याची चर्चा पिंपरी-चिंचवडमध्ये रंगू लागली आहे.**







पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक- 2026 मध्ये मामुर्डी-किवळे- रावेत- गुरूद्वार प्रभाग क्रमांक 16 मधून आशाताई भोंडवे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या माध्यमातून निवडणूक लढवत आहेत. पक्षाच्या सर्वसाधारण जाहीरनाम्यापलीकडे जाऊन आशाताईंनी प्रत्येक गल्ली, वस्ती व सोसायटीतील समस्यांचा सखोल अभ्यास केला आहे. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, सुरक्षा अशा मूलभूत प्रश्नांवर त्यांनी लेखी शब्द दिल्याने नागरिकांमध्ये विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे.“मी केवळ तक्रारी मांडायला नाही, तर उपाय देण्यासाठी आले आहे,” हा त्यांचा स्पष्ट निर्धार मतदारांपर्यंत पोहोचतो आहे, असे त्यांनी म्हटले आहे.



विकासनगरमध्ये नागरिकांशी संवाद साधताना आशाताईंनी काढलेले हे उद्गार त्यांच्या नेतृत्वशैलीचे प्रतीक ठरत आहेत. मोठ्या सभांपेक्षा होम मीटिंग्स आणि कोपरा सभांवर त्यांनी भर दिला आहे. ज्येष्ठ नागरिक, महिला मंडळे आणि तरुणांशी थेट संवाद साधत त्यांनी ‘ऐकून घेण्याला’ प्राधान्य दिले. त्यामुळे त्या “हक्काचं माणूस” म्हणून ओळख निर्माण करत आहेत.

“निवडून येण्याआधीच कामाला सुरुवात” हा मंत्र जपत आशाताईंनी व्हॉट्सॲप हेल्पलाईन सुरू केली आहे. नागरिक आत्तापासूनच तक्रारी नोंदवू शकतात. TECHNO-SAVVY लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचा हा पुढाकार विशेषतः सुशिक्षित व तरुण मतदारांना आकर्षित करत आहे.

#### महिला सक्षमीकरणाचा नवा अध्याय

1. महिलांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि रोजगारासाठी आशाताईंनी दोन महत्त्वाकांक्षी संकल्पना मांडल्या आहेत—

> “मी सत्तेसाठी नाही, सेवेच्या संधीसाठी उभी आहे.तुमचे प्रश्न ऐकणे, त्यावर लेखी उपाय देणे आणि बदल घडवणे—हीच माझी राजकारणाची व्याख्या आहे.”
> **–आशा भोंडवे,** उमेदवार, राष्ट्रवादी, प्रभाग- 16.

2. ‘आशा क्लिनिक’: स्वस्त व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देणारे विशेष क्लिनिक.

3. ‘आशाताईंचा कट्टा’: महिलांच्या सुरक्षेवर चर्चा, समुपदेशन आणि रोजगार संधींसाठी हक्काचे व्यासपीठ.

गेल्या पाच वर्षांतील प्रलंबित प्रश्नांवर—पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, स्वच्छता आणि सुरक्षा—आशाताईंनी ठोस कृती आराखडा सादर केला आहे. “प्रश्नांची जाण, विकासाची ओढ” हे केवळ ब्रीदवाक्य न राहता त्यांच्या कार्यपद्धतीचे प्रतिबिंब बनले आहे.

मिशन-PCMC: उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत विजयी निर्धार सभा उत्साहात

# तुषार सहाणे यांना निवडून द्या!

## तुमच्या प्रश्नांना सोडविण्याची जबाबदारी माझी : उपमुख्यमंत्री अजित पवार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड | कोणत्याही दबावाला न घाबरता, दडपशाही झुगारून प्रभाग आठ मधील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार तुषार सहाणे यांना निवडून द्या. तुमच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी माझी राहील अशा शब्दात उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी प्रभाग क्रमांक आठ मधील राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवार तुषार सहाणे यांच्यासाठी मतदानाचे आवाहन प्रभागातील नागरिकांना केले.**



पिंपरी चिंचवड शहरातील प्रभाग क्रमांक आठमध्ये परिवर्तनाचा संदेश देणारी विजयी निर्धार सभा उत्साहात पार पडली. राज्याचे उपमुख्यमंत्री, पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ही जाहीर सभा झाली. प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि जनसामान्यांच्या हक्कासाठी लढा उभारण्याचा निर्धार या सभेत व्यक्त करण्यात आला.

ही सभा केवळ निवडणुकीची औपचारिक घोषणा नसून प्रभागाच्या परिवर्तनासाठीचा बुलंद आवाज असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागात विकासाला गती देण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

यावेळी तुषार सहाणे यांनी प्रभागाच्या विकासासाठी अष्टप्रधान संकल्पना मांडली. पाणी, पायाभूत सुविधा, स्वच्छता, रोजगार, सुरक्षा, सक्षमीकरण, आरोग्य आणि शिक्षण या आठ मुद्द्यांवर आधारित विकास आराखडा राबविण्याची ग्वाही त्यांनी दिली. शुद्ध आणि समान पाणीपुरवठा, खड्डेमुक्त रस्ते, अद्ययावत उद्याने, सुसज्ज पार्किंग व्यवस्था, स्वच्छ व हरित प्रभाग निर्मिती यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

युवकांसाठी कौशल्य विकासाच्या माध्यमातून रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देणे, महिलांची सुरक्षितता अधिक मजबूत करणे आणि महिलांना आर्थिक व सामाजिकदृष्ट्या सक्षम बनवणे ही प्राधान्ये असल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच सर्वसामान्यांना परवडणाऱ्या आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधा तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त झाला. अजित पवार यांच्या शब्दावर विकासाची खात्री असल्याचे सांगत नळाद्वारे दररोज पाणीपुरवठा, ट्रॅफिक समस्यांवर उपाय, नियमित स्वच्छता आणि प्रदूषणमुक्त परिसर, तसेच हायटेक आरोग्य सुविधांची उपलब्धता या मुद्द्यांची पुनरुच्चार करण्यात आला.

---

भाजप म्हणजे सर्वसमावेशक विकास – भाजप उमेदवारांचा निर्धार

## प्रभाग क्रमांक 25 मध्ये भाजपकडून केवळ विकासाच्या मुद्द्यांवर प्रचार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**वाकड, ताथवडे, पुनावळे) मधील भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना नागरिकांचा पाठिंबा वाढत असून, उमेदवार देखील केवळ विकासाच्या मुद्द्यांवर नागरिकांच्या भेटीगाठी घेत आहेत. भाजपाचे उमेदवार राहुल तानाजी कलाटे, कुणाल वाव्हळकर, रेश्मा चेतन भुजबळ, श्रुती राम वाकडकर यांचा वाकड, ताथवडे, पुनावळे परिसरात प्रचार सुरु आहे.**



प्रभाग क्रमांक २५ मधील परिसरात भाजपच्या उमेदवारांचा प्रचार जोरात सुरू आहे. पदयात्रा, घराघरात भेटी, नागरिक संवाद, सभा आणि बैठकींच्या माध्यमातून भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते थेट जनतेपर्यंत पोहोचत आहेत. केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकासकामांची माहिती, भविष्यातील योजनांचा आराखडा आणि स्थानिक प्रश्नांवर दिले जाणारे ठोस उपाय नागरिकांपर्यंत पोहोचवले जात आहेत. नागरिकांकडूनही या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, भाजपच्या नेतृत्वावर वाढता विश्वास आणि समर्थन स्पष्टपणे दिसून येत आहे.

येणाऱ्या काळात वाहतूक सुगमता, मेट्रो विस्तार, जल व्यवस्थापन प्रकल्पांसह पायाभूत सुविधांपासून प्रभागातील रस्ते, वाहतूक, जलपुरवठा ते मोठ्या विकास आराखड्यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. भाजप सरकारने प्रत्येक समाजघटकासाठी स्वतंत्र योजना, थेट लाभ आणि समान संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. अनुसूचित जाती, ओबीसी, मराठा, आदिवासी, अल्पसंख्याक- कुठलाही समाज मागे राहिलेला नाही. असे विविध मुद्दे उमेदवारांनी प्रचारादरम्यान अधोरेखित केल्याने सोसायट्यांमध्ये भाजपच्या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

> “मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात आणि विशेषतः पुणे–पिंपरी चिंचवड विभागात विकासाला वेगवान दिशा मिळाली आहे. प्रभागात देखील या विकासाच्या कामांनी सकारात्मक बदल घडवून आणले असून, भाजपच्या नेतृत्वाने विकासाचं स्वप्न सत्यात उतरवण्याचा मार्ग सुगम केला आहे.”
> **–राहुल कलाटे,** उमेदवार भाजपा प्रभाग २५

> प्रभाग २५ मध्ये राहुल कलाटे यांनी नगरसेवक म्हणून सरकारी योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. जाती-पातीच्या राजकारणापेक्षा विकास, न्याय आणि समान प्रतिनिधित्वावर विश्वास ठेवणारे नेतृत्व म्हणून राहुल कलाटे प्रभागाला परिचित आहेत.”
> **–कुणाल वाव्हळकर,** उमेदवार भाजपा प्रभाग २५

> केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांमधून सर्वसामान्यांना थेट लाभ मिळालेला असून, विशेषतः लाडकी बहीण योजना महिलांसाठी मोठा आधार ठरत आहे. या सर्व योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी राहुल कलाटे यांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सुरक्षा आणि मूलभूत सुविधांच्या कामांमुळे परिसराचा चेहरामोहरा बदलला असून, नागरिकांचा भाजपवरचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.”
> **–रेश्मा भुजबळ,** उमेदवार भाजपा प्रभाग २५

> “वाकड–ताथवडे–पुनावळे परिसरात मोठ्या प्रमाणावर आयटी कर्मचारी आणि तरुण वर्ग राहतो. त्यांच्या गरजा ओळखून खेळाची मैदाने, जॉगिंग ट्रॅक, फिटनेस सुविधा, वाहतूक सुधारणा आणि सुरक्षिततेसाठी राहुल कलाटे यांनी महत्त्वाची कामे केली आहेत. त्यामुळे त्यांची प्रतिमा केवळ राजकीय नेते म्हणून नाही, तर विकासाभिमुख आणि तरुणांचा विचार करणारे लोकप्रतिनिधी म्हणून आहे. प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी राहुल कलाटे यांच्यावर नागरिकांचा ठाम विश्वास आहे.”**–श्रुती वाकडकर,** उमेदवार भाजपा प्रभाग २५

## मिशन-PCMC: राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड हमीपत्र जाहीर!

# मेट्रो-पीएमपीएमएल मोफत प्रवास!

## 500 चौ.फुट घरांना करमाफी, विद्यार्थ्यांना टॅबलेट

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने नागरिकांसाठी महत्त्वाकांक्षी हमीपत्र जाहीर केले आहे. मेट्रो व पीएमपीएमएल बस प्रवास मोफत, विद्यार्थ्यांना डेटा प्लॅनसह मोफत टॅबलेट, ५०० चौ.फुटांपर्यंतच्या घरांना मालमत्ताकर माफी, रोज नळाद्वारे पाणीपुरवठा व टँकरमुक्त शहर, वादग्रस्त सुधारित विकास आराखडा (डीपी) रद्द करणे, लाडक्या बहिणींना ५ लाख रुपयांचे बिनव्याजी कर्ज आदी प्रमुख आश्वासने या हमीपत्रात देण्यात आली आहेत.**



राष्ट्रवादी काँग्रेस पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षांच्या वतीने 'संकल्प सात, पुन्हा सुरुवात' या नावाने प्रसिद्ध करण्यात आलेल्या या हमीपत्राचे प्रकाशन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी आमदार विलास लांडे पाटील, शहराध्यक्ष योगेश बहल, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे आदी उपस्थित होते.

अजित पवार यांनी सांगितले की, "हे हमीपत्र पिंपरी-चिंचवडकरांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आले आहे. सत्ता मिळताच या सर्व आश्वासनांची अंमलबजावणी केली जाईल."

### प्रमुख हमी व योजना

रोज नळाद्वारे पाणी, टँकरमुक्त शहर :

सर्व प्रभागांत उच्च दाबाने दररोज नळाद्वारे पाणीपुरवठा केला जाईल. पाणीपुरवठ्याचे निश्चित वेळापत्रक तीन महिने आधी जाहीर करण्यात येईल. टँकरमाफियांचे १०० टक्के उच्चाटन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला असून प्रत्येक प्रभागात सामुदायिक विहिरी व दीर्घकालीन जलव्यवस्थापन आराखडा राबविण्यात येणार आहे. जलवाहिन्यांच्या दुरुस्तीसाठी मोबाईल सेन्सर व्हॅन्स तैनात केल्या जातील.

पवना, भामा आसखेड प्रकल्प :पवना प्रकल्पाची रखडलेली पाईपलाईन व भामा आसखेड प्रकल्पातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण केली जातील.

### मेट्रो व पीएमपीएमएल मोफत

सर्व नागरिकांसाठी मेट्रो व पीएमपीएमएल बस प्रवास मोफत करण्यात येणार आहे. लास्ट माईल कनेक्टिव्हिटीसाठी फिडर बस सेवाही उपलब्ध होणार आहे.

### मालमत्ताकर माफी :

१ एप्रिल २०२६ पासून ५०० चौ.फुटांपर्यंतच्या घरांचा मालमत्ताकर माफ केला जाणार आहे. याचा थेट लाभ मध्यमवर्गीय, ज्येष्ठ नागरिक व लहान घरमालकांना मिळणार आहे.

### विद्यार्थ्यांना मोफत टॅबलेट :

डेटा प्लॅनसह मोफत टॅबलेट देऊन डिजिटल शिक्षणाला चालना दिली जाणार आहे.

### लाडक्या बहिणींना बिनव्याजी कर्ज :

कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना स्वयंरोजगारासाठी किंवा उद्योग विस्तारासाठी ५ लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज देण्यात येणार आहे.

### शहरी गरीब आरोग्य योजना :

पुणे महापालिकेच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये शहरी गरीब आरोग्य योजना सुरू करण्यात येणार आहे. सामान्य आजारांसाठी २ लाख व गंभीर आजारांसाठी ५ लाख रुपयांपर्यंत उपचार सहाय्य दिले जाणार आहे. बर्न वॉर्ड, कर्करोग रुग्णालय, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज, टेलिमेडिसिन, स्वस्त दरात MRI व CT स्कॅन आदी सुविधा देण्याचे आश्वासन आहे.

### १०० मॉडेल शाळा :

महापालिकेच्या १०० शाळांचे मॉडेल स्कूलमध्ये रूपांतर, सीबीएसई व आयसीएसई मानांकनाच्या नवीन शाळा, आधुनिक प्रयोगशाळा, क्रीडा सुविधा व कोणतेही अतिरिक्त शुल्क नसलेले शिक्षण देण्यात येणार आहे.

### डिपी रद्द, मालमत्तांचे संरक्षण

वादग्रस्त सुधारित विकास आराखडा रद्द करण्यात येणार असून कायदेशीर मालमत्तांचे पूर्ण संरक्षण दिले जाईल. गुंठेवारी नियमितीकरण प्रक्रिया ऑनलाइन व पारदर्शक करण्यात येणार आहे.

विस्थापनाऐवजी पुनर्वसनावर भर देत स्वतंत्र एसआरए कक्ष स्थापन केला जाईल. तीन वर्षांत प्रकल्प पूर्ण न झाल्यास वाढीव भाडे देण्याची तरतूद असेल.

### नवीन कनेक्टिव्हिटी व मेट्रो लाईन :

निगडी–रावेत–वाकड टेक कॉरिडॉर, मोशी–चिखली–तळवडे ग्रोथ कॉरिडॉर, औद्योगिक लूप, उड्डाणपूल, अंडरपास व वाकड–पिंपळे सौदागर–भोसरी–चाकण नवीन मेट्रो लाईन सुरू करण्याचा समावेश आहे.

### कला व क्रीडा :

कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रासाठी स्वतंत्र कृती आराखडा सात दिवसांत सादर केला जाणार आहे. या सात हमींच्या माध्यमातून पिंपरी-चिंचवडचा सर्वांगीण विकास साधण्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसने केला आहे.

---

## न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगावचा स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात

## शिक्षण विश्व : "विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि आरोग्य या शाळेच्या प्रमुख उद्दिष्टांमध्ये समाविष्ट असावा"

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगाव यांचे वार्षिक स्नेहसंमेलन रामकृष्ण मोरे सभागृह, चिंचवड येथे अत्यंत दिमाखात व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रियाश गायकवाड उपस्थित होते. तसेच संस्थेचे अध्यक्ष विजय पवार सर, सचिव अशोक मोरे सर, खजिनदार सुरेखा पवार मॅडम, उपाध्यक्ष निलेश पलघोमल सर, सुरेश पवार सर, विलास शेलार सर, नयना माने मॅडम, विनायक पवार सर, रमेश पाटील सर, रंजीत माने सर, महादेव जमादार सर, संध्या पवार मॅडम आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.**



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते अखंड हिंदुस्तानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व सरस्वती मातेच्या मूर्तीपूजनाने करण्यात आली. यावेळी उपस्थित पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

प्रमुख पाहुणे डॉ. प्रियाश गायकवाड यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात विद्यार्थ्यांच्या आरोग्याविषयी पालकांना उपयुक्त माहिती व महत्त्वाच्या सूचना दिल्या. तसेच संस्थेचे अध्यक्ष विजय पवार सर यांनीही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा राबवत असलेल्या उपक्रमांबाबत मनोगत व्यक्त केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. विद्या मॅडम यांनी वार्षिक अहवाल सादर केला. चालू शैक्षणिक वर्षात विविध क्रीडा प्रकारांमध्ये तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. यंदाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची संकल्पना "इतिहास भारत का" अशी होती. या माध्यमातून संपूर्ण भारताचा समृद्ध इतिहास प्रभावीपणे सादर करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या नृत्य, नाट्य व समूह सादरीकरणांनी प्रेक्षकांची मने जिंकली. या सादरीकरणांचे उपस्थित पालक, प्रमुख पाहुणे, शिक्षक व मुख्याध्यापिका यांनी भरभरून कौतुक केले.



> "विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे फक्त अभ्यासावर अवलंबून नसते. त्यांच्या शारीरिक स्वास्थ्याची काळजी घेणे, मानसिक तंदुरुस्ती राखणे आणि नैतिक मूल्यांची जोपासना करणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. पालकांनी आणि शिक्षकांनी मिळून विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करावे, जेणेकरून ते भविष्यात सक्षम, तंदुरुस्त आणि समाजोपयोगी नागरिक बनतील."
> –डॉ. प्रियाश गायकवाड,

हा कार्यक्रम जिमखाना अध्यक्ष तमन्ना टीचर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. सर्व शिक्षकवृंदाची उत्कृष्ट साथ लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हर्षवर्धनी टीचर यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी अत्यंत प्रभावीपणे पार पाडले. एकूणच शिस्तबद्ध नियोजन, विद्यार्थ्यांचे कलागुण व इतिहासाची प्रभावी मांडणी यामुळे न्यू इंग्लिश मीडियम स्कूल, थेरगावचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा संस्मरणीय ठरला.

## चिखली प्रभाग 1 मध्ये

# आमदार गोपिचंद पडळकरांच्या सभेने "वारं फिरलं"!

### मिशन- PCMC : भारतीय जनता पार्टीच्या पॅनेलची प्रचंड वातावरण निर्मिती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज





**भाजप नेते आणि आमदार गोपीचंद पडळकर यांनी पिंपरी- चिंचवडमधील जाहीर सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांना थेट इशाराच दिला आहे. काका–पुतण्यावर जोरदार हल्लाबोल करत पडळकरांनी आक्रमक भाषेत टीका केली. "मी दहा वर्षांपासून पवारांच्या नादी लागलो आहे, माझं काहीही करू शकले नाहीत. मग महेश लांडगे यांचं काय करणार?" असा सवाल करत त्यांनी अजित पवारांना टोला लगावला. भाजपच्या नादी लागल्यास भर चौकात नंगा करेल, असा इशाराही पडळकरांनी दिला.**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या भोसरी विधानसभा मतदारसंघातील प्रभाग क्रमांक १ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या प्रचाराला मोठी चालना मिळाली असून, भाजपाचे आक्रमक नेते व आमदार गोपिचंद पडळकर यांच्या जाहीर सभेमुळे संपूर्ण प्रभागात राजकीय वातावरण तापले आहे. त्यांच्या स्पष्ट वक्तृत्वशैलीमुळे आणि ठाम भूमिकेमुळे भाजपाच्या कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे. प्रभाग क्रमांक १ मधील भाजपाचे अधिकृत उमेदवार सुरेश म्हेत्रे, गणेश मळेकर, सोनम मोरे आणि शितल यादव यांच्या प्रचारासाठी आयोजित करण्यात आलेल्या या जाहीर सभेला नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली. यावेळी आमदार गोपिचंद पडळकर यांनी केंद्र व राज्य सरकारच्या विकासाभिमुख धोरणांचा आढावा घेत भाजपाच सर्वसामान्यांच्या विकासाची खरी हमी असल्याचा ठाम विश्वास व्यक्त केला.

पिंपरी-चिंचवड महापालिकेबाबत बोलताना पडळकर म्हणाले, "ही महापालिका सोन्याच अंडं देणारी कोंबडी आहे. विरोधकांना ही कोंबडी कापायची आहे, म्हणूनच ते वारंवार पिंपरी-चिंचवडमध्ये येत आहेत आणि आमदार महेश लांडगे यांच्यावर टीका करत आहेत. महेश लांडगे हे वाघ आहेत. पंजा मारला, तर कार्यक्रम होईल," असा इशाराही पडळकर यांनी दिला.

पडळकर पुढे म्हणाले, "गेल्या ४० वर्षांत विरोधकांनी जो विकास केला नाही, तो नऊ वर्षांत देवेंद्र फडणवीस आणि महेश लांडगे यांनी केला आहे. त्यामुळे आता विरोधकांनी उगाच वल्गना करू नयेत." रोहित पवारांवर पुन्हा हल्ला चढवत ते म्हणाले, "महेश लांडगे हे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले नाहीत. ते घराणेशाहीतले नाहीत, तर इथल्या मातीतले, जनतेतून घडलेले नेते आहेत."

अजित पवारांवर गंभीर आरोप करत पडळकर म्हणाले, "अजित पवारांची छाती फाडली तर १०–१५ कारखाने ढापलेले निघतील. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील अनेक सातबारे त्यांच्या नावावर निघतील. अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणं बाहेर येतील. त्यामुळे महेश लांडगे यांच्या नादी लागू नये. महेश लांडगे हे पैलवान आहेत. कुठल्या क्षणी कुठला डाव टाकतील, सांगता येत नाही. ते अपक्ष म्हणून निवडून आलेले आहेत. आम्ही त्यांना नेता केलं असं म्हणतात, मग तुमचा मुलगा नेता का झाला नाही?" असा सवालही पडळकरांनी उपस्थित केला.

राष्ट्रवादी काँग्रेसवर टीका करत ते म्हणाले, "एक्सपायरी डेट जवळ आलेल्या राष्ट्रवादीच्या नादी लागू नका. २०२९ पर्यंत पक्ष टिकेल की नाही याची शंका आहे. देवेंद्र फडणवीस यांच्यामुळेच अजित पवारांना सन्मानाची खुर्ची मिळाली असून ती नीट सांभाळा, उगाच भाजपच्या नादी लागू नका," असा टोला पडळकरांनी लगावला.

### विकास... नेतृत्व आणि विश्वासाची त्रिसूत्री...

आमदार पडळकर यांनी भाषणात आमदार महेश दादा लांडगे यांच्या माध्यमातून चिखली व परिसरात सुरू असलेल्या विकासकामांचा विशेष उल्लेख केला. डीपी रस्ते, जलशुद्धीकरण प्रकल्प, शैक्षणिक व सांस्कृतिक सुविधा, अंतर्गत रस्त्यांचे जाळे यामुळे परिसराचा चेहरामोहरा बदलत असल्याचे त्यांनी सांगितले. या विकासकामांना सातत्य देण्यासाठी भाजपाचे सक्षम व विश्वासार्ह प्रतिनिधी निवडून देण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. "प्रभाग क्रमांक १ चा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर भाजपाच्या पॅनेलला विजयी करणे आवश्यक आहे," असे ठाम मत आमदार गोपिचंद पडळकर यांनी व्यक्त केले. सुरेश तात्या म्हेत्रे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत त्यांनी सांगितले की, अनुभवी नेतृत्व आणि आमदारांशी असलेले समन्वयाचे नाते प्रभागातील प्रश्न सोडविण्यास उपयुक्त ठरेल. या सभेनंतर प्रभागात भाजपाच्या प्रचाराला अधिक वेग आला असून, आमदार गोपिचंद पडळकर यांच्या उपस्थितीमुळे भाजपाच्या पॅनेलने निवडणूक रणधुमाळीत स्पष्ट आघाडी घेतल्याचे चित्र दिसून येत आहे. विकास, नेतृत्व आणि विश्वास या त्रिसूत्रीवर भाजपाचा प्रचार अधिक प्रभावी ठरत असल्याची प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.

---

## भारतीय जनता पार्टीचा प्रभाग क्रमांक २५ मध्ये विकासाचा संवाद

### मिशन- PCMC : उमेदवार श्रुती वाकडकर यांच्या प्रचाराला वेग

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २५ (वाकड–ताथवडे–पुनावळे) मध्ये भाजपचे उमेदवार श्रुती राम वाकडकर, राहुल कलाटे, कुणाल वाव्हळकर व रेश्मा भुजबळ यांच्या प्रचारासाठी भाजपाचे वरिष्ठ उपाध्यक्ष राम वाकडकर यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत चर्चा केली. या भेटीत परिसरातील नागरी समस्या, विकासकामे आणि आगामी काळातील नियोजन यावर सखोल चर्चा करण्यात आली.**

राम वाकडकर यांनी घरोघरी जाऊन नागरिकांचे प्रश्न जाणून घेतले. रस्ते, पाणीपुरवठा, वाहतूक, आरोग्य सुविधा, महिला सुरक्षा आणि स्वच्छता या विषयांवर नागरिकांनी मते मांडली. "केवळ निवडणुकीपुरते नव्हे, तर कायम नागरिकांसोबत उभे राहणारे नेतृत्व म्हणजेच श्रुती वाकडकर," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भाजपाच्या विकासाभिमुख धोरणांवर विश्वास व्यक्त करत नागरिकांनीही "प्रभाग २५ चा सर्वांगीण विकास हेच आमचे प्राधान्य आहे," अशी भूमिका मांडली. प्रभाग क्रमांक २५ मध्ये श्रुती वाकडकर यांनी आतापर्यंत केलेले सामाजिक आणि विकासात्मक काम नागरिकांच्या स्मरणात आहे.

सर्वसामान्यांच्या अडचणी ऐकून त्यावर पाठपुरावा करणे, प्रशासनाशी समन्वय साधून कामे मार्गी लावणे आणि महिलांसह युवकांना सोबत घेऊन पुढे जाणे, हीच त्यांची ओळख बनली आहे. एकूणच, प्रभाग क्रमांक २५ मध्ये झालेल्या या नागरिक संवादातून श्रुती वाकडकर यांच्यासह भाजपच्या पॅनलला मिळणारा वाढता पाठिंबा आणि विश्वास पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

यावेळी नागरिकांना आवाहन करताना राम वाकडकर म्हणाले, "विकास, पारदर्शकता आणि सुरक्षित भविष्यासाठी कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून श्रुती राम वाकडकर, राहुल कलाटे, रेश्मा भुजबळ, कुणाल वाव्हळकर यांना प्रचंड बहुमताने विजयी करा."

> "प्रभागाचा सर्वांगीण विकास हाच आमचा ध्यास आहे. कमळाला मतदान म्हणजे स्थिर आणि सक्षम विकास वाकड, ताथवडे आणि पुनावळे परिसराला आधुनिक सुविधा, दर्जेदार पायाभूत सुविधा आणि संवेदनशील नेतृत्व देण्यासाठी श्रुती वाकडकर, राहुल कलाटे, कुणाल वाव्हळकर व रेश्मा भुजबळ ह्या भाजपाच्या अधिकृत पॅनलला बहुमताने निवडून द्या.
>
> **–राम वाकडकर,** शहर वरिष्ठ उपाध्यक्ष भाजपा.